## मग मोदींनी युद्धबंदी का केली?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
भारत-पाकिस्तान दरम्यान झालेल्या शस्त्रसंधी वरून आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. युद्धबंदी का जाहीर करावी लागली याचे स्पष्टीकरण केंद्र सरकारने द्यावे अशी मागणी प्रकाश आंबेडकरांनी केली आहे.

युद्धबंदी जाहीर केली नसती, तर १९७१ च्या युद्धाची पुनरावृत्ती झाली असती. पण आता आपण ती संधी गमावली, असेही ते म्हणाले. शिवाय त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भित्रे भागूबाई आणि कणा नसलेले नेतृत्व म्हटले आहे. सोमवारी मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर अनेक आरोप केले.


नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष १६ * अंक ४३ * | * गडचिरोली * | मंगळवार, दिनांक १७ जून २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

### नक्कीच, जातनिहाय जनगणना होणार!

अखेर जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जाहीर झाली. ज्या जनगणनेची आवश्यकता विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वारंवार व्यक्त केली होती. ती आता प्रत्यक्षात उतरत आहे. जेव्हा जेव्हा राहुल गांधी जातनिहाय जनगणनेची चर्चा करीत होते. तेव्हा त्यांच्यावर बेंबीच्या देठापासून ओरडत ओरडत हल्ला करण्यात येत होता. परंतु जेव्हा जातीनिहाय जनगणनेची चर्चा जमिनीपासून आस्मानापर्यंत फैलावत गेली. तेव्हा त्याचे महत्त्व मोदीजींनाही कळून चुकले. हवेची दिशा कोणती आहे, जनतेच्या मनात काय आहे, जनतेची नाडी कधी पकडावी, जनतेशी आपली नाळ कशी जोडावी. त्यासोबतच जनतेच्या मनातील अंतर्ध्वनी कसा ओळखावा, जनतेला आकर्षित करण्यासाठी कोणती कृती करावी, जनतेच्या मनातील मन की बात कशी ओळखावी, जनमानसाच्या ह्रदयाला हात कसा घालावा आणि जनतेला घोषणांच्या क्षीरसागरात आनंदाचे भरते कसे आणावे. या सर्व प्रकारांमध्ये आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी अत्यंत पारंगत आहेत. या सर्व गोष्टींमध्ये ते किती पारंगत आहेत. हे सांगायची गरज नाही. कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाचे श्रेय विरोधकांना घेऊन द्यायचेच नाही. हे त्यांचे सूत्र आपण आतापर्यंत बघितलेले आहे. आता जातनिहाय जनगणना हा मुद्दा आपल्या कवेत घेऊन मोदीजींनी आपल्या भक्तांना तरबेज करून टाकलेले आहे. ही जनगणना अगदी व्यवस्थित पार पाडावी. म्हणून दुरांतोसारखी गती घेऊन ही जनगणना व्यवस्थित पार पडणार नाही. अशी मोदीजींची ठाम समजूत आहे. म्हणूनच भारतातील बंद पडलेल्या अनेक पॅसेंजर गाड्यांप्रमाणे ही जातीनिहाय जनगणना संथगतीने परंतु योग्य दिशेने करण्याचे कार्य आता सरकार करणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा 1 ऑक्टोबर 2026 या तारखेपासून सुरू होणार आहे. मुहूर्तार्चा पहिला टप्पा बरोब्बर वर्षभर चालेल. त्यात जातीय जनगणना बिनचूक व्हावी, हाच या सवार्मागचा उद्देश असेल असे समजण्यास हरकत नाही. अधिसूचना आज जाहीर झाली असली. तरी पहिल्या टप्प्याची सुरुवात करण्यासाठी सरकार जवळ यापुढे 14 ते 15 महिन्यांचा कालावधी आहे. हा अवधी भरपूर आहे. 2026 च्या महात्मा गांधींच्या जन्मदिनाच्या म्हणजेच जयंतीच्या पूर्वसंध्येला हे पवित्र कार्य सुरु होईल. विनाकारण गडबड घाई करून जनगणना उरकण्याचा सोपा मार्ग सरकार अवलंबणार नाही. हीच चांगलीच गोष्ट आहे. हा पहिला टप्पा संपल्यावर दुसरा टप्पा साधारण 1 मार्च 2027 ते 28 या कालखंडात सुरू राहील. कदाचित तिसरा टप्पा किंवा अखेरचा टप्पा 2029 च्या निवडणुकीआधी पूर्ण करण्यात येईल, असा आमचा अंदाज आहे. म्हणजे मागच्या निवडणुकीत राहुल गांधींनी प्रत्येक प्रचार सभेत जातीय जनगणना हा मुद्दा उचलून लोकांच्या मनात या जनगणने बद्दलची जिज्ञासा उत्पन्न केली होती. ती आपोआपच शांत होईल. असा अत्यंत साधासुधा हिशोब आहे. या मुद्द्यावर आता कुणालाही वेगळे मुद्दे मांडून गुद्दे लगावता येऊ नये. याची संपूर्ण तयारी करण्यात येत आहे. ही सरकारची कौशल्य योजना निश्चितपणे अभिनंदनच पात्र आहे. या जनगणनेनंतर त्याचा निकाल येण्यासाठी 2029 च्या निवडणुकांचा निकाल येणे अपेक्षित असेल. मग या जटील कोष्टकाचा उलगडा कसा हळुवारपणे करण्यात येणार आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्या सरकारला जे करायचे असते. ते तर सरकार करतेच. पण जे करायचे नसते आणि जे जनतेला हवे असते. तेही आपण करतो असे दाखवायचे असते. याबाबतीत पक्षीय प्रवक्ते आणि एकपक्षीय वृत्तवाहिन्या या सगळ्याच गोष्टींचा जयजयकार करण्यासाठी आतुरतेने सज्ज असतात. आम्ही वरच उल्लेख केलेला आहे की, कोणत्या मुद्द्यावर जनतेची नाडी पकडता येते. तेच मुद्दे हाती घेऊन हाती असलेल्या यंत्रणेचा उपयोग करणे, यात आपले सरकार माहीर आहे. आता आपण एकच आशा करूया. निदान या प्रश्नाचे उत्तर 2029 च्या मे-जून नंतर तरी मिळावे, अशी आशा करूया. कारण तेव्हा बहुधा लोकसभेची निवडणूक मोदीजींनी जिंकलेली असेल आणि जनतेला या प्रश्नाचे उत्तरही दिसेल. ही आशा करण्यात काही चुकीचे नाही. सरकारच्या जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचा आपणही आदर करावा आणि जेव्हाकेव्हा जनगणना करणारे कर्मचारी आपल्या दारी येतील. तेव्हा तेव्हा त्यांना सविस्तर माहिती द्यावी. म्हणजे त्यांचाही उद्धार होईल. एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## काहींना गल्लीपासून दिल्लीपर्यंत केवळ
# आरोप करण्याची सवय!

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा संजय राऊतांना टोला; पालघर येथे विद्यार्थ्यांत रमले





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
काही लोक देशाच्या सैन्यावर आरोप करतात, देशाच्या शौर्यावर आरोप करतात. त्यांना गल्लीपासून दिल्लीपर्यंत फक्त आरोपाचेच पडलेले असते. अशा लोकांना उत्तर देण्यासाठी मी बसलेलो नाही. अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांना प्रत्युत्तर दिले.

कुंडमळा पुलाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी बांधकामाला मंजुरी दिली. या पुलासाठी ८ कोटी मंजूर केले. मात्र, मंत्री महोदयांनी ८० हजारांच्या पत्रावर स्वाक्षरी केली असल्याचा आरोप राऊत यांनी केला होता. त्यावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्यातील शाळांचा आज पहिला दिवस होता. मुख्यमंत्री फडणवीस पालघरच्या शाळेत दाखल झाले. त्यांनी शाळकरी विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत केले. या वेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

वाढवण बंदर हे महाराष्ट्र आणि देशाचे चित्र बदलणारे आहे. यात स्थानिकांना फायदा झाला पाहिजे. यासाठी काही करार करण्यासाठी मी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलो असल्याचे त्यांनी सांगितले.

स्थानिकांना रोजगार मिळण्यासाठी आपण अनेक करार करत आहोत. स्थानिकांचा रोजगार वाढला पाहिजे, त्यांना प्रशिक्षण मिळायला हवे, त्यासाठी हे करार असल्याचे त्यांनी सांगितले. वाढवण बंदराच्या माध्यमातून पालघर जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

कुंडमळा पुलाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी हा पुल धोकादायक असल्याची घोषणा आधीच केली होती. गावकऱ्यांनी देखील त्या ठिकाणी पुल धोकादायक असल्याची पाटी लावली होती. तरी दुर्दैवाने काही पर्यटक त्या ठिकाणी गेले.

वास्तविक आपण अशा गोष्टींकडे फारसे लक्ष देत नाही. मात्र, यात कोणाची चूक नाही. हा पुल इतक्या मोठ्या प्रमाणात कमकुवत झाला असेल, असे कोणाला वाटले नसेल. म्हणूनच पर्यटक त्या ठिकाणी गेले. यातून भविष्यात शिकण्यासारखे बरेच असल्याचे ते म्हणाले.

## धीरूभाई अंबानी पेट्रोल चोरून कोट्यधीश झाले

### दमानिया यांनी शेअर केला व्हीडिओ



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
रिलायन्स उद्योग समुहाच्या माध्यमातून जगभरात भारताचा मान उंचावणारे दिवंगत उद्योगपती धीरूभाई अंबानी यांच्याविषयी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वादग्रस्त विधान केले आहे.

धीरूभाई अंबानी पेट्रोल पंपावरील पेट्रोल चोरी करून कोट्यधीश झाले, असे ते म्हणालेत, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. सोबतच त्यांनी अजित पवारांच्या विधानाचा व्हिडिओ पोस्ट करत त्यांना खोचक टोला हाणला आहे.

त्या म्हणतात, 'धीरूभाई अंबानी पेट्रोल चोरून कोट्यधीश झाले आणि तुम्ही?' असा सवाल त्यांनी यासंबंधी केला आहे. दरम्यान, राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी अजित पवार धीरूभाई अंबानी यांना चोर म्हणाल्याचा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे. अजित पवार 'चोरून' नव्हे तर 'सोडून' म्हणाले, असे ते म्हणालेत. एका सभेत धीरूभाई अंबानी यांच्याविषयी एक विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

## सुनीताने पूर्वीही केला पाकिस्तानात जाण्याचा प्रयत्न

### कारगिल पोलिस लवकरच घेणार सुनीताचा ताबा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
हेरगिरीचा संशय असलेली सुनीता सध्या नागपूरच्या कारागृहात आहे. कारगिल पोलिस तिचा ताबा घेण्यासाठी लवकरच परत येणार आहेत. तिचा मुलगा अद्यापही बालकल्याण समितीकडेच आहे.

दरम्यान सुनीताने यापूर्वीही दोन वेळा अमृतसरमधून पाकिस्तानात जाण्याचा प्रयत्न केला असल्याची खळबळजनक माहिती पुढे आली आहे. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे आणि संवेदनशील होत चालले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुनीता मार्च महिन्यातदेखील अमृतसरला गेली होती. त्यावेळीदेखील तिने अमृतसरमधून पाकिस्तानला जाण्याचा दोन वेळा प्रयत्न केला होता. मात्र स्थानिक पोलिसांनी तिला पकडले. न्यायालयाच्या आदेशाने तब्बल २० दिवस ती अमृतसर पोलिसांच्या ताब्यात राहिली.

सुटका झाल्यानंतर ती १ मे रोजी कपिलनगरातील घरी परतली. तीन दिवस राहिल्यानंतर पुन्हा ४ मे रोजी आपल्या १२ वर्षीय मुलासोबत घरून निघाली. यावेळी ती नेपाळ, भूतान, अरुणाचल प्रदेश, राजस्थान, जम्मू-काश्मीर आदी ठिकाणी फिरायला गेली.

नंतर १४ मे रोजी पाकिस्तानात गेली. २३ मे रोजी तिला बीएसएफ जवानांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणात सुनीतावर हेरगिरीचा संशय व्यक्त करीत अमृतसर पोलिसांनी ऑफिशियल सिक्रेट ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल केला आणि हे प्रकरण कपिलनगर पोलिसांकडे वर्ग केल्याची माहिती हाती आली आहे.

अनेक प्रश्नांची उत्तरे उद्यापही अनुत्तरीत
इतर महिलांसारखीच असलेल्या सुनीताचा कामधंदा सुरळीत होता. दरम्यान असे काय झाले की तिला पाकिस्तानात जाण्याची ओढ लागली? यासंदर्भात कुणालाच काही ठाऊक नाही. हेच कोडे तपास यंत्रणेला सोडवायचे आहे. चर्चा खूप आहेत. तिने अनेक गोष्टी सांगितल्यादेखील. परंतु ठोस पुरावा अद्याप तपास यंत्रणेला मिळालेला नाही. अतिशय सामान्य असलेल्या सुनीताची पाकिस्तानपर्यंत कशी लिंक लागली, युद्धासारखी स्थिती असताना ती सीमा रेषा ओलांडून पाकिस्तानला कशी गेली, तब्बल 9 दिवस राहिली, पाकिस्तानी लष्कराने तिला सहज कसे काय सोडले, हे प्रश्न तपास यंत्रणेला सतावत आहेत.

#### सुनीताच्या पतीने मागितला मुलाचा ताबा

सुनीताचे १८ वर्षांपूर्वी लग्न झाले. तिला १२ वर्षांचा एक मुलगा आहे. पती कुठलाच कामधंदा करीत नसल्याने ती त्याच्यापासून विभक्त झाली. ती गेल्या ११ वर्षांपासून मुलासह आईकडेच राहते. तिला एक बहीण आणि दोन भाऊ आहेत. सुनीता केअर टेकरचे (नर्स) काम करायची तसेच कपडे विकून उदरनिर्वाह करीत होती. आता अचानक सुनीताचा पती सतीशने मुलाचा ताबा मागितला असल्याची माहिती पुढे आली आहे. आता त्याची आई नसल्याने मुलाचा ताबा देण्यात यावा, अशी विनंती सतीशने बालकल्याण समितीकडे केली आहे. सध्या तो एका कंपनीत कपडे शिवण्याचे काम करतो.

## जात जनगणनेची अधिसूचना जारी

### पहिल्या टप्प्यात ४ राज्यांत ऑक्टोबर २०२६ पासून लागू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
गृह मंत्रालयाने सोमवारी जात जनगणनेसाठी अधिसूचना जारी केली आहे. केंद्र सरकार दोन टप्प्यात जात जनगणना करणार आहे.

अधिसूचनेनुसार, पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल. त्यात हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि लडाख ही ४ डोंगराळ राज्ये समाविष्ट आहेत.
दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होईल. यामध्ये देशातील उर्वरित राज्यांमध्ये जनगणना सुरू होईल. त्याआधी रविवारी गृहमंत्री अमित शहा यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत १६ व्या जनगणनेच्या तयारीचा आढावा घेतला. केंद्राने ३० एप्रिल २०२५ रोजी जात जनगणना करण्याची घोषणा केली होती.

स्वातंत्र्यानंतर देशातील ही पहिली जात जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले होते की, जात जनगणना मूलभूत जनगणनेसोबतच केली जाईल.

काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष जातीय जनगणनेची मागणी करत आहेत. देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. ती दर १० वर्षांनी केली जाते. त्यानुसार, पुढील जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोविड-१९ साथीच्या आजारामुळे ती पुढे ढकलण्यात आली.

मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०११ मध्ये सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना करण्यात आली होती. ती ग्रामीण विकास मंत्रालय, शहरी विकास मंत्रालय आणि गृह मंत्रालयाने केली होती. तथापि, या सर्वेक्षणाचा डेटा कधीही सार्वजनिक केला गेला नाही. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वेबसाइटवर फक्त एससी-एसटी कुटुंबांचा डेटा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

१९४८ च्या जनगणना कायद्यात एससी-एसटींची गणना करण्याची तरतूद आहे. ओबीसींची गणना करण्यासाठी त्यात सुधारणा करावी लागेल. यामुळे ओबीसीच्या २,६५० जातींचा डेटा उघड होईल. २०११ च्या जनगणनेनुसार, १,२७० एससी आणि ७४८ एसटी जाती आहेत.

### केस, नख गळतीनंतर आता हाताला भेगा

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६ :
बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांम्ध्ये यंदा अचानक केस गळणे, टक्कल पडणे आणि बोटांची नखे गळून जाणे यांसारख्या गूढ आजारांचे प्रमाण वाढले आहे.

सुरुवातीला खामगाव आणि शेगाव तालुक्यांत दिसून आलेला हा आजार आता चिखली आणि मेहकरसारख्या घाटमाथ्याच्या भागांतही पसरत आहे. या प्रकरणाला अनेक महिने झाले असतानाही भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेचा अहवाल अद्यापही अडकलेला आहे.

मेहकर तालुक्यात आता हाताला भेगा पडण्याच्या आजाराची नवीन लक्षणे समोर आली आहेत. विशेषतः शेलगाव देशमुख या गावातील सुमारे २० ग्रामस्थांनी अशा प्रकाराच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे नोंदवल्या आहेत.




इराणच्या परराष्ट्र मंत्रालयावर हल्ला, आतापर्यंत २२४ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था
तेहरान/तेल अवीव, दि. १६ :
इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष चौथ्या दिवशीही सुरू आहे. दरम्यान, सोमवारी इराणने सर्व परदेशी नागरिकांना देश सोडण्याची परवानगी दिली आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय अडकले आहेत. ते आता भारतात परतू शकतील.

इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने पुष्टी केली आहे की सध्याच्या परिस्थितीत, देशाचे विमानतळ बंद असले तरी, जमिनीच्या सीमा खुल्या आहेत. मंत्रालयाने तेहरानमधील सर्व राजनैतिक मिशन आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना या निर्णयाची माहिती दिली आहे.

एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की ज्या मिशनना त्यांचे नागरिक किंवा कर्मचारी परदेशात पाठवायचे आहेत त्यांना इराणच्या जनरल प्रोटोकॉल विभागाला प्रवाशांची नावे, पासपोर्ट क्रमांक, वाहनांची माहिती, देशातून निघण्याची वेळ आणि त्यांना ज्या सीमेवरून जायचे आहे त्याबद्दल आगाऊ माहिती द्यावी लागेल.

दुसरीकडे, इराणने सोमवारी सकाळी इस्त्रायलवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला. इराणी सैन्याने मध्य इस्त्रायलमध्ये अनेक ठिकाणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. यामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

इस्त्रायलमध्ये इराणी हल्ल्यात आतापर्यंत २४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ६०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. यापूर्वी रविवारी रात्री इस्त्रायलने इराणच्या परराष्ट्र मंत्रालयावर हल्ला केला होता. यामध्ये १०० हून अधिक जण जखमी झाले होते.

इराणमध्ये आतापर्यंत २२४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १,२७७ हून अधिक जण जखमी झाले आहेत. त्याच वेळी, अमेरिकास्थित मानवाधिकार कार्यकर्ते गटाने इराणमध्ये ४०६ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा केला आहे.

#### १५०० भारतीय विद्यार्थी इराणमध्ये अडकले

इराणमध्ये सुमारे दीड हजारावर भारतीय विद्यार्थी अडकले असून, त्यांचे पालक कमालीचे चिंतीत आहेत. 'सरकारला माझी एकच विनंती आहे की आमच्या मुलांना इराणमधून बाहेर काढा. आता ते अजिबात सुरक्षित नाहीत. तेहरान जळत आहे. तिथे एकही रस्ता, कोणताही परिसर सुरक्षित नाही. इंटरनेट बंद आहे. आम्ही सर्वजण खूप घाबरलो आहोत, असे अनेक पालकांनी सांगितले.

## दहशतवाद्यांच्या निधीशिवाय पहलगाम हल्ला शक्य नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
दहशतवाद्यांच्या निधीवर लक्ष ठेवणारी संघटना फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सने सोमवारी म्हटले की, पहलगाम दहशतवादी हल्ला दहशतवाद्यांच्या पाठिंब्याशिवाय होऊ शकला नसता. यामध्ये दहशतवाद्यांना निधी देण्यात आला आहे.

पहलगाम हल्ल्याच्या ५५ दिवसांनंतर एफएटीएफचे हे विधान आले आहे. ग्लोबल टेरर वॉच डॉगने म्हटले आहे की दहशतवादी हल्ल्यांमुळे लोकांचा मृत्यू होतो, त्यांना अपंगत्व येते आणि जगभरात भीती पसरते.

एफएटीएफचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा भारतीय अधिकाऱ्यांनी पाकिस्तानकडून दहशतवादाला सतत पाठिंबा देणे आणि शस्त्रे खरेदी करण्यासाठी अनेक निधी वापरल्याचा पदार्फाश केला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अशा कारवायांमुळे पाकिस्तानला एफएटीएफच्या 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकता येते. पहलगाममधील दहशतवादी हल्ला २२ एप्रिल रोजी झाला होता. यामध्ये एका नेपाळीसह २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता.

## वारीला गाडीने जाणाऱ्यांना टोलमाफी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून वारकऱ्यांसाठी एक दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. वारीला गाडीने जाणाऱ्यांना टोलमाफी देण्यात आली आहे.



१८ जूनपासून १० जुलैपर्यंत दरम्यान हा निर्णय लागू असणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केला असून १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गांवर ही टोलमाफी देण्यात आली आहे.

## विमान अपघात
# ११९ मृतदेहांची ओळख पटली

### विजय रुपाणी यांना गार्ड ऑफ ऑनर देत अंत्यसंस्कार

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १६ :
अहमदाबाद विमान अपघातात प्राण गमावलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यावर राजकोटमधील रामनाथ पारा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.
सोमवारी संध्याकाळी विजय रुपाणी यांना २१ तोफांची सलामी (गार्ड ऑफ ऑनर) देण्यात आली. तत्पूर्वी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री सीआर पाटील, गुजरातचे मुख्यमंत्री-राज्यपाल आणि इतर नेते रुपाणी यांच्या घरी पोहोचले आणि श्रद्धांजली वाहिली.

रुपाणी यांचे पार्थिव त्यांच्या राजकोट येथील निवासस्थानी प्रकाश सोसायटी (निर्मला रोड) ठेवण्यात आले होते . आज सकाळी अहमदाबादमध्ये त्यांचे पार्थिव कुटुंबियांना सोपवण्यात आले. त्यानंतर, पार्थिव चार्टर्ड विमानाने राजकोटला आणण्यात आले.



#### ब्लॅक बॉक्सचा व्हॉइस रेकॉर्डर सापडला

रविवारी, अधिकाऱ्यांनी पंतप्रधान मोदींचे सचिव डॉ. मिश्रा यांना सांगितले की फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (उश्फ) सापडले आहेत आणि सुरक्षित केले आहेत. विमानाचे दोन्ही ब्लॅक बॉक्स सापडल्याने तपासकर्त्यांना अपघाताचे कारण शोधणे सोपे होईल.

#### ७६ मृतदेह सुपूर्द

अहमदाबाद विमान अपघातानंतर चार दिवसांत २५० मृतदेहांचे डीएनए नमुने घेण्यात आले. आतापर्यंत ११९ डीएनए जुळले आहेत, त्यापैकी ७६ मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत.
१२ जून रोजी एअर इंडियाचे अहमदाबाद ते लंडन विमान एआय-१७१ (७८७-८ बोईंग ड्रीमलायनर) उड्डाणानंतर काही वेळातच कोसळले. विमान बीजे मेडिकल कॉलेज आणि सिव्हिल हॉस्पिटलच्या वसतिगृह इमारतीशी धडकले. या अपघातात २७५ जणांचा मृत्यू झाला आहे, ज्यामध्ये विमानातील २४१ जण (२२९ प्रवासी (एक जिवंत) आणि १० केबिन क्रू, २ पायलट), वसतिगृह इमारत आणि उर्वरित ३४ जणांचा समावेश आहे.

## गणेशोत्सवावर गदा येऊ देणार नाही!



**मुंबई :** हिंदुत्वाचं प्रतीक असलेला सार्वजनिक गणेशोत्सव कुणाच्याही दबावामुळे बंद होणार नाही,ह्व असा रोखठोक इशारा सांस्कृतिक कार्यमंत्री आणि मुंबई भाजपाचे अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी आज परेलमधील शिरोडकर सभागृहात आयोजित गणेश मंडळांच्या मेळाव्यात दिला.

काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि उबाठा सेनेच्या आडून चालणाऱ्या शहरी नक्षलवाद्यांच्या अजेंड्याला यश मिळू देणार नाही. ही लढाई अर्धवट थांबलेली नाही, सरकार ३० जूनपर्यंत मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनाबाबतची भूमिका न्यायालयात मांडेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

शेलार म्हणाले, २००३ मध्ये नैसर्गिक जलस्त्रोतांवर हिंदूंच्या धार्मिक विधी बंद करण्यासाठी याचिका दाखल झाली आणि त्यात पीओपी मूर्तींचाही विषय घुसवण्यात आला. तेव्हाच जर सरकारने योग्य भूमिका घेतली असती, तर आज इतका संघर्ष करण्याची वेळ आली नसती. काँग्रेस आघाडी सरकार, शिवसेनेचे आदित्य ठाकरे आणि उबाठा सेनेने सणविरोधी पवित्रा घेतला. उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना गणेशोत्सवाच्या बाजूने उभं राहण्याऐवजी त्यांनी विरोधात भूमिका घेतली. मुंबई महापालिकेच्या २०१८ च्या अर्थसंकल्पात पीओपीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव त्यांच्याच आदेशाने आला होता. हे बेगडी हिंदुत्व आता उघडं पडले असा थेट आरोप शेलार यांनी केला.

## अग्निवीर मुरली नाईकांना शहीद सैनिकाचा दर्जा द्या



**मुंबई** : देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या अग्निवीर जवान मुरली नाईक यांना शहीद सैनिकाचा दर्जा देण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. सरकारने ही मागणी पूर्ण केली नाही, तर या प्रकरणी हायकोर्टात दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकमध्ये निर्माण झालेल्या तणावात मुरली नाईक यांचा ९ मे रोजी नियंत्रण रेषेवर मृत्यू झाला होता. ते घाटकोपरच्या कामराज नगर झोपडपट्टीत राहत होते. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत नाईक यांना शहीद सैनिकाचा दर्जा देण्याची मागणी केली. ते म्हणाले, लाईट इन्फंट्रीमध्ये कार्यरत असलेले आणि रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथील रहिवासी असलेले अग्निवीर जवान मुरली नाईक यांना सेवेदरम्यान वीरगती प्राप्त झाली. मात्र, केंद्र व राज्य सरकारकडून त्यांच्या कुटुंबासाठी कोणतीही ठोस मदत अद्याप जाहीर झालेली नाही. ही बाब अत्यंत दुर्दैवी असून अन्यायकारक आहे. सरकारने मुरली नाईक यांच्या कुटुंबियांना एक कोटींची मदत करून त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करावे. अन्यथा आम्हाला उच्च न्यायालयात जावे लागेल. ॲड. आंबेडकर म्हणाले, ह्लसैनिकांना ज्या सवलती, मदत आणि सन्मान देण्यात येतात, त्या अग्निवीरांना देखील मिळाल्या पाहिजेत. महाराष्ट्र शासनाने आधीच जाहीर केले आहे की सेवेदरम्यान वीरगती प्राप्त झाल्यास मदतीची तरतूद आहे. मग मुरली नाईक यांच्या बाबतीत अपवाद का? असा सवाल त्यांनी केला.

## शिवरायांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याचा खचलेला भाग बुजवला

**मालवण :** मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील नव्यानेच उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याच्या बाजूच्या जमिनीचा काही भाग खचला होता. तसेच मोठे भगदाडही पडले होते. त्यानंतर आता सार्वजनिक बांधकाम विभागाने या भागाची दुरुस्ती करत खचलेला भाग बुजवल्याचे समोर आले आहे.

रात्री उशिरापर्यंत खचलेल्या भागात भराव टाकून सिमेंटने सर्व भाग बुजवण्यात आला आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने नियमित पाहणी तसेच देखभाल केली जाणार असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुख्य अभियंता यांना घटनास्थळी जाण्याचे आदेश दिले.

### दुचाकी चालकांचा वाद झाल्याने पुलावर झाली होती गर्दी

# कुंडमळा दुर्घटनेचे खरे कारण समोर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :**

पुण्याच्या मावळ तालुक्यातील कुंडमळा पूल कोसळून ४ जणांचा बळी गेला आहे. हा पूल वापरासाठी बंद होता. पण त्यानंतरही अचानक त्याच्यावर गर्दी झाल्यामुळे तो कोसळला.

या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठली असताना आता ही दुर्घटना नेमकी कशी घडली? याचे खरे कारण समोर आले आहे. एका प्रत्यक्षदर्शी तरुणाने दोन दुचाकी चालकांचा वाद व त्यानंतर झालेल्या गर्दीमुळे ही घटना घडल्याचा दावा केला आहे.

गणेश पवार असे या प्रत्यक्षदर्शी तरुणाचे नाव आहे. रविवारी दुपारी इंद्रायणी नदीवरील कुंडमळा पूल कोसळला तेव्हा तो तिथेच होता. त्याने सांगितले की, मी कुंडमळ्यावर राहतो. मी तिथला स्थानिक आहे. नदीच्या अलीकडे दोन पाहुण्यांना सोडण्यासाठी मी आलो होतो. मी त्यांना सोडून परत जात होतो, तेव्हा तिथे दोन दुचाकी चालकांत वाद झाला. हा वाद पाहण्यासाठी पर्यटकांची पुलावर गर्दी झाली. त्यातून ही घटना घडली.

तो पुढे म्हणाला की, कुंडमळा पुलावरून दोन दुचाकींना जाता येत नाही. त्याचवेळी दोन दुचाकी विरुद्ध दिशेने पुलावर आल्या. पुलावर अगोदरपासूनच काही पर्यटकही उभे होते. त्यावेळी गर्दी एवढी होती की, कुणालाही पुढे-मागे जाता येत नव्हते. त्यातच दुचाकी चालकांमध्ये वाद झाला. यामुळे पूल हलू लागला. त्यानंतर या गोंधळात काही क्षणांतच पूल पडला. मी स्वतः पाण्यात पडलो. पण मी स्थानिक असल्यामुळे मला पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज होता. त्यामुळे मी पलीकडे न जाता अलीकडे आलो. त्यामुळे माझा जीव वाचला.

सध्या माझी दुचाकी नदीपात्रातच आहे. ती अद्याप काढण्यात आली नाही. प्रशासन काय म्हणते ते पाहून दुचाकी काढण्याचा निर्णय घेणार आहे. कारण, अद्याप नदी पात्रात उतरण्यास परवानगी देण्यात आली नाही. मी लोखंडी पुलाला पकडून स्वतःची सुटका करून घेतली. त्यानंतर ३-४ पर्यटकांनाही बाहेर काढले, असे गणेश पवार यांनी सांगितले.

दुसरीकडे, मावळ परिसरात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. यामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे नदीत वाहून गेलेल्या पर्यटकांचा शोध घेताना अनेक अडचणी येत आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

या दुर्घटनेत बळी गेलेल्या मृतांच्या कुटुंबीयांना सरकारने प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याची घोषणा केली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्चही सरकारने करण्याचा निर्णय घेतला आहे.



**फादर्स डेचे सेलिब्रेशन आणि बाप-लेकाचा मृत्यू**

कुंडमळा दुर्घटनेत रोहित माने व त्यांचा मुलगा विहान माने या दोघांचाही बळी गेला आहे. हे दोघे फादर्स डेचे सेलिब्रेशन करण्यासाठी गेलेल्या या परिसरात गेले होते. दुसरीकडे, नांदेड जिल्ह्यालगतच्या बासर येथे गोदावरी पात्रात स्नानासाठी उतरलेल्या ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

### पूल दुर्घटनेत सरकारचा दोष : सपकाळ



पुणे जिल्ह्यातील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या मृत्यूंसाठी सरकार जबाबदार असून ही दुर्घटना नव्हे, तर सरकारी निष्काळजीपणामुळे झालेला थेट मनुष्यवध असल्याचा घणाघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. त्यांनी या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यात पर्यटकांचा ओघ असतो हे माहीत असूनही धोकादायक पूल खुला ठेवण्यात आला. प्रशासनाने फक्त धोकादायक पूल अशी पाटी लावून आपली जबाबदारी संपवली, पण ती पाटी पाट्या टाकण्याचे प्रतीक बनली आहे, असा संतप्त सवाल त्यांनी केला. राज्य सरकार वर्षभरात पूल दुरुस्त करू शकले नाही, निधी मंजूर असूनही काम प्रलंबित राहिले, म्हणजेच सरकार अपयशी ठरले, असेही ते म्हणाले. या दुर्घटनेत ५५ पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेले, त्यातील चार जणांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

## सत्तेचा उपयोग तुम्हालाच...

### दुर्घटनेवरून राज ठाकरे सरकारवर फणकारले



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६ :** हा धोकादायक पूल आधीच का पाडला नाही? पावसाळ्याआधीच तपासणी का झाली नाही? आणि जर सरकारला हे करता येत नसेल, तर तुमच्या सत्तेचा उपयोग नेमका कोणाला? असा संतप्त सवाल राज ठाकरे यांनी कुंडमळा दुर्घटनेवरून राज्य सरकारला थेट उद्देशून केला आहे.

दुर्घटनेतील मृतांना एक्स अकाउंटवर श्रद्धांजली अर्पण करत सरकारच्या निष्काळजीपणावर आणि ढिसाळ नियोजनावर राज ठाकरेंनी खरमरीत टीका केली. प्रत्येक दुर्घटनेनंतर 'सरकार खंबीरपणे नागरिकांच्या पाठीशी उभं आहे' हेच वाक्य ऐकायला मिळतं,पण नेमकं प्रत्यक्षात काय केलं जातं? असा टोला त्यांनी लगावला.

जर पूल धोकादायक होता, तर त्यावर संपूर्ण बंदी का नव्हती? तो पाडून नव्याने बांधण्याचं काम का हाती घेतलं नाही? सरकारकडे यंत्रणा असतानाही प्रत्येक वेळी निष्क्रियता का दिसते? असे राज ठाकरेंनी विचारले.

राज्यात किती पूल धोकादायक आहेत, याची तपासणी नियमानुसार काही महिन्यांनी करायला हवी. विशेषतः पावसाळ्याच्या आधी. ती जर प्रशासन करत नसेल, तर सत्तेत असलेल्यांनी ती जबाबदारी घेतली पाहिजे. पण इथे ना नियोजन, ना जबाबदारी... मग सत्तेचा अनुभव नेमका कुठे गेला? असा सवाल करत त्यांनी सरकारची कार्यक्षमताच प्रश्नांकित केली.

राज ठाकरे यांनी नागरिकांनाही काही प्रमाणात जबाबदारी घेण्याचं आवाहन केलं. धोकादायक स्थळांवर जाताना, आपल्या कुटुंबासोबत काळजी घ्यायला हवी. पण हे सरकारला माफ करण्याचं कारण ठरत नाही, असे ते म्हणाले.

### इंद्रायणी पूल दुर्घटनेची जबाबदारी

## अजित पवार घेणार का?

### ८ कोटींचे काम, ८० हजारांच्या पत्रावर सही



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** कुंडमळा पुलाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी बांधकामाला मंजुरी दिली. या पुरासाठी ८ कोटी मंजूर केले. मात्र, मंत्री महोदयांनी ८० हजारांच्या पत्रावर स्वाक्षरी केली.

एकतर मंत्र्याने झोपेत सही केली किंवा जनतेला मुर्ख बनवले जात आहे, अशी घणाघाती टीका शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सोमवारी केली. राऊत यांनी मंत्र्यांचे पत्र देखील माध्यमांना दाखवले. त्यावेळचे मंत्री आणि संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली.

महाराष्ट्रमध्ये नवीन सरकार आल्यापासून पनवती लागली आहे. त्यामुळे या सरकारला केंद्रात आणि महाराष्ट्रात पनवती सरकार म्हणायला हरकत नाही. सातत्याने अपघात, घातपात सुरू असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या माध्यमातून त्यांनी मावळ मधील पुल दुर्घटना आणि मालवण मधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती खचलेल्या जमिनीबाबत सरकारवर निशाणा साधला आहे.

संजय राऊत म्हणाले की, पुंछ भागात सतरा लोक मारले गेले, त्याच्या आधी पहलगाम येथे २६ महिलांचा सिंदूर उजाडले गेले. अहमदाबादला भयानक असा विमान अपघात झाला. वास्तविक तो अपघात की, आणखी काही? याचा तपास सुरू आहे. यातही महाराष्ट्राचे १५ ते १६ लोक मरण पावले आहेत. काल दोन दुर्घटना घडल्या आहेत. असे म्हणत राऊत यांनी सत्ताधारी भाजप महायुती वर निशाणा साधला आहे.

राज्यातील सरकार पनवती असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. नव्या पुलासाठी पैसे मंजूर झाले मात्र ते वापरले गेले नाहीत. आठ कोटींचे काम असताना पत्रावर ८० हजारांचा उल्लेख करण्यात आला असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. यावर मंत्री रवींद्र चव्हाण यांची सही देखील असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

कालच्या घटनेची अजित पवार यांनी नैतिक जबाबदारी घ्यायला हवी. अजित पवार आणि त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी देखील संजय राऊत यांनी केली आहे.

## शिंदे गटाच्या मंत्र्याच्या घरात अघोरी पूजा?

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी आपल्या घरात अघोरी पूजा केल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते वसंत मोरे यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे तक्रार करण्याचाही इशारा दिला आहे.

भरत गोगावले यांनी दोन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्यावर निशाणा साधला होता. उद्धव ठाकरे हे रश्मी ठाकरे यांचे नेहमीच ऐकतात. त्यांच्याच हस्तक्षेपामुळे शिवसेना फुटली, असे ते म्हणाले होते.

वसंत मोरे यांनी सोमवारी त्यांची ही टीका धुडकावून लावताना गोगावलेंवरच अघोरी पूजा केल्याचा आरोप केला. वसंत मोरे म्हणाले, भारत गोगावले यांच्या अकलेचे दिवाळे निघाले आहे. त्यांनी रश्मी ठाकरे यांच्यावर केलेले आरोप अत्यंत चुकीचे आहेत. माझा गोगावले यांना प्रश्न आहे, त्यांनी १४ ऑक्टोबर २०२४ रोजी बगलामुखी मंदिरातून पुजारी कशाला आणले होते? त्यांनी ज्या पूजा घातल्या होत्या, त्या कशाला घातल्या होत्या? बाहेर राज्यातून मांत्रिक आणायचे आणि पूजा घालायच्या. गोगावलेंच्या घरात अशी पूजा होत असेल तर आम्ही निश्चितच अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे तक्रार करू, असे मोरे म्हणाले.

### उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीत बसलेल्या

## या इसमाला ओळखता का?

### सुषमा अंधारेंचा किरीट सोमय्यांवर निशाणा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर निशाणा साधला आहे. सुषमा अंधारे यांनी किरीट सोमय्या यांचा एक फोटो ट्विट करत टीका केली आहे.

सुषमा अंधारे यांनी ट्विट केलेल्या फोटोमध्ये किरीट सोमय्या हे निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयात बसलेले दिसत आहेत. यावरून सुषमा अंधारे यांनी टीका केली आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीत बसलेल्या या इसमाला ओळखता का? होय होय, तेच ते, मुलुंडचे एचडी व्हिडिओ स्पेशलिस्ट, असे म्हणत सुषमा अंधारे यांनी टीका केली आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, ५-५ वर्ष अभ्यास करून अधिकारी झालेल्या अभ्यासू लोकांच्या खुर्चीवर असे ऐरे-गैरे लोक बसूच कसे शकतात? भाजपशासित राज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पार पोतेरे करून ठेवले असल्याची टीका अंधारे यांनी केली आहे.

दरम्यान, सुषमा अंधारे यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची हॉटेल ताज येथे झालेल्या भेटीवर देखील भाष्य केले होते.

सुषमा अंधारे म्हणाल्या होत्या, राज ठाकरे यांनी आपल्या एका मुलाखतीत महाराष्ट्राच्या हितापेक्षा आपला इगो मोठा नसल्याचे विधान केले होते. त्यानंतर माझ्या पक्षाने व माज्या प्रमुखांनी त्यावर सकारात्मक भूमिका घेतली होती. त्यासाठी आवश्यक असणारी पावले उचलली होती. पण आता मनसे प्रमुखांच्या मनात काय आहे हे आपल्याला सांगता येत नाही. त्यांची भेट कोणत्या तरी कारणांसाठी झाली असेल. ते आम्हाला माहिती नाही, असेही त्या म्हणाल्या होत्या.

# महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** राज्यात पावसाने जोर धरला असून, हवामान विभागाने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. जिल्ह्यात सरासरी १०९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पावसामुळे समुद्रात उधाण आले असून, लाटांनी रौद्ररूप धारण केले आहे. जिल्ह्यातील प्रमुख नद्या दुथडी भरून वाहत असून, त्यांची पाणीपातळी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**होडावडे पूल पाण्याखाली**

वेंगुर्ले-बेळगाव राज्य महामार्गावरील होडावडे पूल पाण्याखाली गेल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. रात्रभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे हा पूल जलमय झाला असून, गेल्या दोन तासांपासून या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. वाहतूक पयार्यी मागार्ने वळवण्यात आली आहे.

खेड तालुक्यात जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली

रत्नागिरी जिल्ह्याला देखील पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. खेड तालुक्यातील मुसळधार पावसामुळे जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

संगमेश्वर तालुक्यातील शास्त्री आणि सोनवी या दोन नद्यांना देखील पूर आलेला आहे. रात्रभर पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे संगमेश्वर तालुक्याकतील धामणी, संगमेश्वर इथं पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच अर्जुना आणि कोदवली नद्यांना पूर आल्याने राजापूर शहरातील जवाहर चौकात पुराचे पाणी शिरले . इतर भागातही पावसाचा कहर सुरू आहे.

# एसटीच्या नव्या प्रवासाला धार्मिक दिशा

### पंढरपूर, अष्टविनायक दर्शन आता वाजवी दरात : खासगी ट्रॅव्हल्सना परिवहन मंत्र्यांचे खुले आवाहन!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** राज्यातील गोरगरीब आणि सर्वसामान्य भाविकांसाठी एक दिलासा देणारी घोषणा करण्यात आली आहे. एसटी महामंडळ आता धार्मिक पर्यटनात उतरत आहे. अष्टविनायक, पंढरपूर, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर अशा प्रमुख तीर्थक्षेत्री जाणाऱ्या सहली आता एसटीच्या माध्यमातून वाजवी दरात अनुभवता येणार आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे खुले आवाहन केले आहे.

एसटी मुख्यालयात आयोजित विशेष बैठकीत बोलताना सरनाईक म्हणाले, राज्यभरातून दरवर्षी लाखो भाविक धार्मिक स्थळांना भेट देतात. मात्र, अनेकांना आर्थिक अडचणींमुळे ही स्वप्नपूर्ती शक्य होत नाही. आता एसटी आणि खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या ऐतिहासिक भागीदारीतून धार्मिक सहली उपलब्ध होतील, ज्या सर्वसामान्यांना



परवडतील आणि सुविधा देखील उत्तम असतील.

सुट्ट्यांमध्ये एसटीच्या अनेक गाड्या अर्धवट भरतात किंवा रिकाम्याच धावतात. या रिकाम्या सीट्सचा उपयोग धार्मिक पर्यटनासाठी करून महसूलात वाढ करण्याचा मंत्रच यामागे आहे. यातून एसटीलाही उत्पन्न मिळेल आणि भाविकांनाही सुलभ प्रवास.

**श्रावणात सहलींची सुरुवात**

सरनाईक यांनी जाहीर केलं की येत्या श्रावण महिन्यापासून अष्टविनायक, पंढरपूर, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर अशा सहलींचे आयोजन सुरू होईल. भोजन, निवास, स्वच्छता अशा सर्व सुविधा एका पॅकेजमध्ये वाजवी दरात उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असेल.

या उपक्रमामुळे धार्मिक पर्यटनाला नवा आयाम मिळणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना, रोजगार निर्मिती आणि श्रद्धास्थळांचा विकास घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बैठकीच्या अखेरीस परिवहन मंत्री सरनाईक यांनी राज्यातील सर्व ट्रॅव्हल्स कंपन्यांना आवाहन केलं आहे की, भाविकांच्या सेवेसाठी पुढे या; एसटीसोबत धार्मिक पर्यटनाची नवी वाट उघडा. एसटी आता केवळ प्रवासाचे साधन नसून, श्रद्धेच्या प्रवासातील विश्वासाचं नवं वाहन ठरणार आहे.

# मंत्र्यांचा हट्ट, मुख्यमंत्र्यांचा अडसर!

### खासगी सचिवांच्या नियुक्तीवरून महायुतीत शीतयुद्ध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :** राज्याच्या महायुती सरकारमध्ये आतल्या आत खदखद वाढत असल्याचे चित्र अधिकच स्पष्ट होत आहे. तब्बल सहा महिन्यांनंतरही सात मंत्र्यांचे खासगी सचिव अद्याप नेमले गेलेले नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या शिफारसींना संमती नाकारली आहे. या ठिणगीवरून सरकारच्या अंतर्गत संघषार्ला चांगलाच पेट बसला असून, शिंदे गट आणि राष्ट्रवादीतील काही मंत्री आता उघड नाराजी व्यक्त करत आहेत.

**शिंदे गटातील मंत्र्यांचा संताप**

मुख्यमंत्री कार्यालयाने अद्याप मंजुरी न दिल्यामुळे उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, जलसंधारण मंत्री संजय राठोड, राष्ट्रवादीचे दत्ता भरणे आणि छगन भुजबळ, तसेच भाजपचे वनमंत्री गणेश नाईक हे सात मंत्री आपापल्या खासगी सचिवांच्या प्रतीक्षेत आहेत.

या मंत्र्यांनी आपल्या पसंतीचे अधिकारी सुचवले असतानाही त्यांच्यावर मुख्यमंत्री कार्यालयाने शिक्कामोर्तब न केल्याने नाराजी उफाळून आली आहे.

फक्त सचिवच नव्हे, २२ ओएसडीच्याही नेमणुका अडकल्या

केवळ खासगी सचिवच नव्हे तर, २२ विशेष कार्य अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही फाईलमध्येच अडकल्या असून, अनेक मंत्री व त्यांच्या खात्यांचे प्रशासन ठप्प पडल्यासारखे झाले आहे. निर्णय प्रक्रियेचा वेग मंदावल्यामुळे धोरणात्मक कामकाजावर थेट परिणाम होत आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून कडक चाळणी**

मविआ सरकारच्या काळात काम केलेल्या किंवा वादग्रस्त रेकॉर्ड असलेल्या अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री कार्यालयाकडून थेट मंजुरी नाकारली जात आहे. यामागे प्रशासकीय शिस्त आणि पारदर्शकता राखण्याचा उद्देश आहे की राजकीय संदेशवहन? यावर सध्या चर्चा रंगली आहे.

खासगी सचिव पदावर विश्वासातील व्यक्तीच हवी, यावर मंत्र्यांचा कटाक्ष आहे. पण असा निवडीचा हट्ट कधी कधी कारभाराच्या कार्यक्षमतेवर गदा आणू शकतो, हे देखील अनेक प्रशासकीय जाणकार अधोरेखित करत आहेत.

या संपूर्ण घडामोडींवरून मुख्यमंत्र्यांचे कार्यालय आणि शिंदे गट व राष्ट्रवादीतील मंत्र्यांमध्ये सत्तासंघषार्ची सूक्ष्म झळ जाणवत आहे. निर्णयमुक्तीला लांबणीवर टाकत ठिणग्यांपासून वणवा टाळण्याचा प्रयत्न सुरू असला, तरी नाराज मंत्र्यांच्या चेहऱ्यावरचा विसंवाद अधिक गडद होताना दिसतो आहे.

महायुतीत अंतर्गत समन्वयाचा अभाव, सत्तेतील शिस्त आणि दडपशाही यांचा सामना करत मंत्र्यांना आता स्वतःच्या कार्यालयातही स्वतंत्रपणे काम करता येत नाही, ही खंत अनेकांच्या चचेर्चा विषय ठरत आहे. पुढील काही दिवसांत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांमध्ये संवाद होऊन हा पेच सुटतो की संघर्ष अधिकच उफाळून येतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## पॅराडाईज इंग्लिश स्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**आरमोरीः** शाळेचा पहिला दिवस म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणीच होय. कुठे हसू कुठे रडू अश्या वातावरणात तालुक्यातील पराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल येथे शाळेचा पहिला दिवस कुठे औक्षण करून तर कुठे फुगे देऊन तर कूठे गाणे म्हणून नवप्रेशितांचे धुमधडाक्यात स्वागत करण्यात आले. प्रवेशित विद्यार्थी हे नर्सरी ते दहाव्या वर्गाचे होते. मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी म्हणून विविध शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे संस्थापक गोविंदराजन कवंडर, विभाग प्रमुख विजयालक्ष्मी कवंडर, मुख्याध्यापक केशवन कवंडर, मुख्याध्यापिका सुजाता अवचट, उपमुख्याध्यापिका किरण नेऊलकर यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आले. तसेच शिक्षकवृंद मोनाली त्रिकोलवार,, प्रतिभा घाटूरकर माधुरी भोयर प्रभा मोटघरे झांसी इंदुरकर प्रणाली सहारे अस्मिता सेलोकर, शारदा घुग्गुसकर, निर्मला नेऊलकर , मंजू सपाटे, आदी उपस्थित होते.

# गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांनी ‘इस्त्रो’ ला घेतली उड्डाण

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १६ :** गडचिरोली: गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आणि आर्थिक मागास कुटुंबांमधील विद्यार्थ्यांसाठी रविवार दिवस ऐतिहासिक ठरला. समाज कल्याण विभागाच्या सिरोंचा, वांगेपल्ली (अहेरी) आणि नवेगाव (गडचिरोली) येथील निवासी शाळांमधील १२० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विमानप्रवा. साद्वारे बंगळूरु येथील इस्रो केंद्राला भेट देण्यासाठी उड्डाण केले. विशेष म्हणजे, यातील अनेक विद्यार्थ्यांनी यापूर्वी साधी रेल्वेही पाहिली नव्हती, किंवा जिल्ह्याचे मुख्यालयही पाहिले नव्हते. त्यांच्या या स्वप्नवत प्रवासाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथे उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

### मुख्यमंत्र्यांकडून विमानतळावर विद्यार्थ्यांना शुभेच्छा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ते कुठे जात आहेत, कसे जाणार आहेत आणि काय पाहणार आहेत, असे आपुलकीने विचारले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ‘मुलांनो, खूप खूप अभ्यास करा आणि यशस्वी व्हा,’ या शब्दात प्रेरित केले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके आणि गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनीही विमानतळावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**डॉ. सचिन मडावी यांच्या संकल्पनेतून साकारली योजनाः** या अभिनव उपक्रमाची संकल्पना सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) डॉ. सचिन मडावी यांनी मांडली होती. जिल्हाधिकारी पंडा यांनी त्यास तत्काळ मंजुरी दिली. तसेच पालकमंत्री देवेंद्र फडणवीस व सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांनी या योजनेसाठी निधी मंजूर केला. तत्पुर्वी गडचिरोली येथून या विद्यार्थ्यांना बसद्वारे हिरवी झेंडी दाखवून नागपूर विमानतळावर रवाना करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सुर्यवंशी, प्रकल्प अधिकारी चेतन हीवंज या प्रसंगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील या अविस्मरणीय क्षणाला त्यांच्या पालकांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू पाहायला मिळाले.

### अंतराळाप्रतीचे प्रतीक म्हणून ‘इस्त्रो’ ची ओळख

भारतीय अवकाश संशोधन संस्था ‘ईस्त्रो’ ही भारत सरकारची राष्ट्रीय अवकाश संस्था असून, उपग्रह, रॉकेट आणि अवकाश तंत्रज्ञान विकासासाठी कार्यरत आहे. जगभरात भारतीय अंतराळ प्रगतीचे प्रतीक म्हणून ‘इस्रो’ ची ओळख आहे.

# अहेरी शहरात आ. आत्राम यांच्या हस्ते विविध विकास कामाचा शुभारंभ



**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. १६ :** शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार धर्मरावबाबा आत्राम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. १५ जून रविवार रोजी आमदार धर्मराव बाबा आत्राम यांनी विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करून विकास कामांचे धडाका लावले.

या प्रसंगी अहेरी नगर पंचायतीचे मुख्याधिकारी गणेश शहाणे, नगर पंचायतीचे उपाध्यक्ष शैलेश पटवर्धन, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष रियाज शेख, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येरावार, तालुका अध्यक्ष नागेश मडावी, ज्येष्ठ नेते श्रीकांत मद्दीवार, सुरेंद्र अलोणे, इशाक शेख, जावेद अली, नगर सेवक विलास सिडाम, नगर सेविका नौरास शेख, ज्योती सडमेक , अजय सडमेक, पितांबर कुळमेथे, योगेश दंडिकवार, आदित्य पुसलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथमतः अहेरी वांगेपली ॲप्रोच रोडचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी लोकार्पण केले,. त्यानंतर तेलंगणा राज्याला जोडणारा तेलंगणा महाराष्ट्र सीमेवरील वांगेपली येथे गेरा फाट्याला जोडणारा बायपास रोडचे भूमिपूजन केले. तसेच अहेरी नगर पंचायत अंतर्गत प्रभू सदन कॉलनीतील सी. सी. रोडचे, लो. हार समाजाचे समाज मंदिर, बेघर कॉलनीतील समाज मंदिराचे भूमिपजून केले. प्रामुख्याने पॉवर हाऊस कॉलनी येथे आदिवासी समाजाचे समाज मंदिराचे लोकार्पण केले. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.


**MAHAVITARAN** — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**NOTICE INVITING SHORT E-TENDER**

Proposals invited by this office from Registered, Reputed & Experienced Bidders/Agencies, Firms, Companies & Contractors in the prescribed Tender Form for the Monthly Meter Reading of LT consumers up to 20kW (Excluding AG consumers other than **Ag metered Urban LT consumers coming under Municipal Corporation, Municipal Council, Nagar Parishad and Nagar Panchayat)** under Dhanora sub division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs, Bill Printing and Bill distribution up to consumer /consumer premises for vide **Tender No. BILLING/EE/DIV/GADCHIROLI/T-19/06-2025 of cost of Rs.12.54 Lakhs.** This tender is available on **https://etender.mahadiscom.in/eat App/** website w. e. f. **Dt.18.06.2025** Upload the Tender-offer duly filled on or before **Dt.25.06.2025** up to **17:00 hrs.** Pre Bid Meeting is on **dt. 23.06.2025 at 15.00 hrs.** at Division Office Gadchiroli. The Tender will be opened on **Dt. 26.06.2025 at 11:00 hrs.,** if possible. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the Newspapers.

**Executive Engineer,**
**PRO. No. 60** — **O & M Division, MSEDCL, Gadchiroli**


## अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यास अटक



**गडचिरोली :** जिल्ह्यात अवैध अंमली पदार्थ तस्करी व इतर अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी कठोर कारवाईचे निर्देश सर्व पोस्टे/ उपपोस्टे/ पोमकें प्रभारी अधिकारी यांना दिले आहेत. याच पार्श्वभुमीवर १५ जुन रोजी गडचिरोली पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे गडचिरोली शहरात मोटारसाकलवर फिरून वेगवेगळ्या ठिकाणी गांजा विक्री करणाऱ्या आरोपीस पोलिसां. नी अटक केली.

सागर कवडू बावणे वय २५ रा. कोटगल, हा शहरात अवैधपणे अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावेळी पोलिसांनी सागर बावणे यांचे ताब्यातील वाहन राहते घराची झडती घेतली असता १३ हजार ८०० रूपये किंमतीचा गांजा, १ मोटारसायकल अंदाजे किंमत ७५ हजार असा एकूण ९० हजार ७०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. यप्रकरणी सागर बावणे याच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

## वाहनासह ८.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अहेरीः** अहेरी शहरातून दारूची तस्करी होणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून वाहनासह ८ लाख २८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई अहेरी पो. लिसांनी मध्यरात्री १२.३० वाजताच्या सुमारासे गे फाटा येथे केली.

प्राप्त माहितीनुसार, अहेरी शहरातून अवैधरित्या चारचाकी वाहनातून दारूची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती अहेरी पोलिसांना मिळाली. माहितीवरून पोलिसांनी गेर्रा फाटा येथे सापळा रचला. दरम्यान, मध्यरात्री १२.३० वाजताच्या सुमारास महागाववरून अहेरीकडे भरधाव वेगाने येणारे चारचाकी वाहन संशयास्पदरित्या थांबले. पोलिस पथक वाहनाच्या दिशेने पुढे जात असताना चालक अंधाराचा फायदा घेत जंगलात फरार झाला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता २ लाख रुपये किंमतीची देशी दारू, २८ हजार ८०० रुपये किंमतीची विद. शी दारू आढळून आली. पोलिसां. नी दारू व ६ लाख रुपये किंमती. चे वाहन, असा एकूण ८ लाख २८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.


## महाराष्ट्र शासन कार्यालय
## कार्यकारी अभियंता
## सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,
## चंद्रपूर- ४४२४०१
## ई निविदा क्र. २०/२०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर-४४२४०१ (दु. क्र. ०७१३२-२७०८४२, Email- eetribal.chandrapur@gmail.com). खालील कामाकरीता महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागातील पंजिबध्द कंत्राटदार यांचे कडून ब-१ नमुण्यातील ई निविदा (ऑनलाईन) प्रणाली द्वारे मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावरून (https://mahatenders.gov.in) डाउनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रूपये) | कंत्राटदारांची वर्गवारी | बयाना रक्कम (रूपये) | निविदा किंमत (रूपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा येरमागड, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे मुलीचे वसतीगृह बांधकाम करणे. | १०,१५,५९,२४२ | वर्ग १-(क) व त्यावरील | ५,०८,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| २ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा घाटी ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथे मुलींचे वसतीगृह बांधकाम करणे. | १०,०७,२१,५०९ | वर्ग १-(क) व त्यावरील | ५,०४,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ३ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा जांभुळघाट, ता. चिमूर जिल्हा चंद्रपुर येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ९,२४,८०,३३८ | वर्ग १-(क) व त्यावरील | ४,६३,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ४ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा मरेगाव, ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपुर येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ९,१४,२५,५०१ | वर्ग १-(क) व त्यावरील | ५,५८,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ५ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा देवाडा ता. राजुरा, जिल्हा चंद्रपुर येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ९,०४,४६,०२९ | वर्ग १-(क) व त्यावरील | ५,५६,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ६ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा पाटण, ता. जिवती, जिल्हा चंद्रपुर येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ८,३१,९९,३५४ | वर्ग १-(क) व त्यावरील | ४,१६,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ७ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा येरमागड, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ६,७८,५२,५६० | वर्ग २ व त्यावरील | ३,४०,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ८ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा अंगारा, ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ६,७३,८०,६०३ | वर्ग २ व त्यावरील | ३,३७,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ९ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा भाडभिडी ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ६,६५,६५,९३४ | वर्ग २ व त्यावरील | ३,३३,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| १० | शासकीय आदिवासी आश्रमशाळा घाटी, ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ६,६३,६०,९९३ | वर्ग २ व त्यावरील | ३,३२,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| ११ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा जांबीया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ५,७८,२३,६१४ | वर्ग २ व त्यावरील | २,९०,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| १२ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा कोठी, ता. भामरागड, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ५,०४,३६,०६५ | वर्ग २ व त्यावरील | २,५३,००० | ३५४०/- | ३३० दिवस |
| १३ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा गुड्डीगुडम, ता. अहेरी, जिल्हा गडचिरोली येथे मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे. | ४,६३,४१,२८७ | वर्ग २ व त्यावरील | २,३२,००० | २,३६०/- | ३३० दिवस |
| १४ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा बामणी ता. सिरोंचा, जिल्हा गडचिरोली येथे मुलींचे वसतीगृह बांधकाम करणे. | ४,३१,४०,८३७ | वर्ग २ व त्यावरील | २, १६,००० | २,३६०/- | ३३० दिवस |
| १५ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा आमगाव, ता. आमगाव जिल्हा गोंदिया येथे मुलींचे वसतीगृह, संरक्षण भिंत, व अंतर्गत रस्ता बांधकाम करणे. | ३,८८,९६,०४८ | वर्ग २ व त्यावरील | १,९६,००० | २,३६०/- | ३३० दिवस |

खालील संकेतस्थळावर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. (https://mahatenders.gov.in)(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग चंद्रपूर-४४२४०१ यांचे कार्यालयातील सुचना फलक

(नितिन मुत्यालवार)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी)विभाग
चंद्रपूर

DGIPR-2025-26/No.-5/C1177



## निविदा सुचना
## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग

**Main Portal :** http://wrd.maharashtra.gov.in

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा, दुरध्वनी क्रमांक (०७१८४) २५०८९५, E-mail: eevhelidb@rediffmail.com हे महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ब-१ नमुन्यात त्यांची निविदा निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहेत.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. दस्तावेज कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा, यांच्या कार्यलयात दि. २३/०६/२०२५ पासून दि. ३०/०६/२०२५ पर्यंत उपलब्ध होवू शकतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित रक्कम रू. | इसारा रक्कम | निविदा उपलब्ध कालावधी | निविदा स्विकृती व उघडणे | प्रत्येक निविदा संचाची किंमत रू. (नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळोधी- मोकासा उपसा सिंचन योजना ता. चामोशी जि. गडचिरोली येथील ३३ के. व्ही. एक्स. एल. पी. ई. एच.टी. केबल 3C x300 स्वेअर एम. एम. हीट श्रिन्केबल इन-डोअर आणि आऊट-डोअर टर्मिनेशन किटचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम. **(निवीदा क्र. काअ/विजविवउसिंविभं/तळोधी-मोकासा उसिंयो /०८/२०२५-२६)** | ३,०१,४०१/- | ३,१००/- | दि. २३/०६/२०२५ ते दि. २०/०५/२०२५ | निविदा सादर करणे दि.०२/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उपघडण्यात येईल. | रू. ११८०/- (नापरतावा) |
| २ | डोंगरगाव गाव उपसा सिंचन योजना ता. आरमोरी, जि. गडचिरोली येथील पंपगृहाकरीता तसेच उपसा सिंचन योजना परिसरातील उपकरणाकरीता Early Steamer Lighting Arrester बसविण्याच्या कामाकरीता पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम. **(निवीदा क्र. काअ/विजविवउसिंविभं/ डोंगरगाव-ठाणेगाव उसियो एल. ए./०९/ २०१५-२६)** | ४,९०,१२८/- | ५,०००/- | दि. २३/०६/२०२५ ते दि. २०/०५/२०२५ | निविदा सादर करणे दि.०२/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उपघडण्यात येईल. | रू. ११८०/- (नापरतावा) |
| ३ | चिचडोह बॅरेज ता. चामोशी जि. गडचिरोली येथील चिचडोह बॅरेज प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात असलेली तळोधी गावाजवळील रस्त्याच्या पुलाच्या बांधकामास छेदणाऱ्या ११ के. व्ही. एल. टी. वाहिनी व डी.टी.सी. चे स्थलांतरण आणि उंची वाढविण्याचे काम. **(निवीदा क्रं. काअ/विजविवउसिंविभं/ चिचडोह बॅरेज डी. टी. सी. /१०/२०२५-२६)** | ६,७४,४२८/- | ६,८००/- | दि. २३/०६/२०२५ ते दि. २०/०५/२०२५ | निविदा सादर करणे दि.०२/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उपघडण्यात येईल. | रू. ११८०/- (नापरतावा) |

१. केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक संस्था यांनी आकारलेले सर्व कर, शुल्क (जी.एस.टी. वगळून) यांचा उद्धरत दरामध्ये समावेश असावा. निविदाकारानी जी.एस.टी. वगळून दर उद्धरत करावेत. स्वीकृत निविदा किमतीवर जी.एस.टी. देय राहील.
जी.एस.टी. शासनास वेळोवेळी भरण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराने जी.एस.टी. कंत्राटदाराने जी.एस.टी. भरणा केलेबाबतची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे, पुरावे, पावत्या सादर केल्यानंतर व त्याची आवश्यक खातरजमा या कार्यालयाने केल्यानंतरच त्याची कंत्राटदारास परतफेड करण्यात येईल.

२. निविदा विषयक थोडक्यात दिनांक निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे. सविस्तर निविदा सुचना http://wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**टीपः** कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र. ६७९/काअ/विजविवउसिंविभं/निली/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन
विभाग, भंडारा ४४१९०४
दिनांक १३/०६/२०२५

प्रतः सुचना फलक, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा

(टा. अ. गायधने)
कार्यकारी अभियंता
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन
विभाग, भंडारा

**जा.क्र./जिमाका/गड/जाहि/७५/२०२५**



PNINO-MAHAMAR 2010585 **महासागर गडचिरोली** मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

अहमदाबादमध्ये घडलेली विमान दुर्घटना हा एक अपघात नव्हती. तर तो एक जागृत नरसंहार होता, असे आता म्हटले जात आहे. २७५ हून अधिक निरपराध नागरिक मृत्यूमुखी पडले. त्यात राजकारणी होते, इंजिनिअर होते, डॉक्टर होते, विद्यार्थी होते, आयटी तज्ञ होते, शिक्षक होते, व्यापारी होते, समाजाचे आधारस्तंभ होते. या सर्वांच्या कुटुंबावर काय आघात झाला, हे फक्त त्या कुटुंबालाच नव्हे तर संपूर्ण देशाला जाणवले. पण याही परिस्थितीत पत्रकार आपल्या धर्माला जागले की नाही, यावर मात्र खल सुरू झाला आहे. अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर भारतीय मीडियाने असंवेदनशील वार्तांकनाचा जो किसळवाणा प्रकार सुरु केला आहे त्याला नीचपणा हाच शब्द वापरला पाहीजे. कोळसा झालेल्या मृतदेहांची ओळख पटवणे प्रशासनासाठी आव्हान ठरत आहे. डिएनए टेस्ट करुन मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरु आहे. मृतांचे नातेवाईक प्रचंड मोठ्या मानसिक दबावाखाली आहेत. अशावेळी त्यांच्या प्रतिक्रीया कॅमेऱ्यावर घेणे सुरु आहे. एकूणच प्रसार माध्यमांची विश्वासार्हता चर्चिली जात असून तिचा सूर चांगला वाटत नाही. लाईव्ह अपडेट्स मिळविण्याच्या नादात जो हीडीस प्रकार जगाने पाहीला ते व्हायला नको होता. पत्रकारीतेचे विकृत स्वरूप म्हणजे पत्रकारितेच्या तत्वांचा ऱ्हास आणि गैरवापर. यापूर्वी सनसनाटी बातम्या, खोट्या बातम्या आणि अर्धसत्य बातम्यांचा प्रसार करणे, तसेच पत्रकारितेचा वापर करून एखाद्या व्यक्ती किंवा समूहाला बदनाम करणे किंवा कोणत्याही विशिष्ट राजकीय अजेंडासाठी बातम्यांचा वापर करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. पण या अपघाताच्या निमित्ताने इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या प्रतिनिधींनी कुणाच्या प्रतिक्रिया घ्याव्यात किंवा घेऊ नये याचे तारतम्य न बाळगल्याने तो आता टीकेचा विषय झाला आहे. त्यामुळे एकूणच इलेक्ट्रॉनिक्स असो वा प्रिंट माध्यम असो सर्वांच्याच वाट्याला शिव्यांची लाखोली येत आहे. पत्रकारांनी द्वारपालांची भूमिका पार न पाडता निष्पक्ष, वस्तुनिष्ठ, अचूक आणि संतुलित माहिती वाचक आणि दर्शकांसमोर सादर करणे हे पत्रकारितेचे मुख्य तत्व आहे. खोट्या बातम्याचे प्रकरण उघडकीला आल्यानंतर आणि समाज माध्यमांचा मोठा प्रभाव लक्षात घेता सध्याच्या काळात हे अतिशय महत्वाचे आहे. सनसनाटी, पक्षपाती बातम्या आधुनिक काळातील माध्यमांचे दुः ख बनले आहे. कोणत्याही परिस्थितीत तिरकस आणि अभिप्रायपूर्ण वृत्तांकनाला अर्थपूर्ण वृत्तांकन म्हणता येणार नाही. असे म्हटले जाते की, माध्यमांनी केवळ लोकशाहीचे रक्षण करणारा पहारेकरी म्हणून काम न करता समाजाला भेडसावणाऱ्या कुप्रथांविरोधात लढायला हवे. पण गेल्या काही वर्षात माध्यमांमध्ये आमूलाग्र बदल झाला आणि त्याचबरोबर पत्रकारितेच्या मूल्यातही बदल झाला. पूर्वी पत्रकारिता सेवेचे मिशन म्हणून पाहिली जात होती, पण आता पत्रकारांनी गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. याशिवाय माध्यमांनी पत्रकारांसाठी आचार संहिता तयार करण्याची वेळ आली आहे. अलिकडे तर स्मार्ट फोन वापरणारा प्रत्येकजण एक संभाव्य पत्रकार बनला आहे.





# प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता संपण्याच्या मार्गावर?



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आता म्हटले जात आहे की, महामार्गावरील प्रवासी सुरक्षित नाहीत, रेल्वे प्रवासी सुरक्षित नाहीत, विमान प्रवासी सुरक्षित नाहीत, पर्यटक सुरक्षित नाहीत, देशाच्या सीमा सुरक्षित नाहीत, विद्यार्थी सुरक्षित नाहीत, शेतकरी सुरक्षित नाहीत, कामगार सुरक्षित नाहीत. मग देश मात्र सुरक्षित हातात आहे, असे राजकारणी का म्हणत असतात?

विमान अपघाताच्या वेळी जी पत्रकरीता दिसली ती खऱ्या पत्रकारांना देखील आवडली नाही. कारण आपल्यासमोर झालेला विमान अपघात म्हणजे एका क्षणात सगळं काही संपल्याची स्थिती होती. त्याच क्षणी, टीव्ही स्क्रीन्सवर आपण काय बघू लागलो तर 'आम्हीच पहिले पोचलो!', 'आम्हीच पहिलं दाखवलं!' 'आमचं एक्सक्लुसिव्ह!'

वास्तविक या मृत्यूच्या राशींवर उभं राहून त्यांनी ब्रेकिंग न्यूजची जाहिरात केली. कॅमेऱ्यांपुढे पडलेली मृतदेहं, पायाखालून ओसंडून वाहणारा रक्ताचा तलाव आणि त्यात ठेचून गेलेली माणुसकी. पायलट सबरवाल यांचे ८८ वर्षांचे वडील अजूनही सुन्न होते आणि त्यांच्याच समोर माइक ढकलून विचारलं गेलं, आपल्या मुलाच्या मृत्यूवर काय म्हणाल? आता ते काय म्हणणार? त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठे दुःख समोर असताना वयाच्या शंभरीकडे झुकणारे ते पिताजी काय बोलू शकणार?

परंतु आपणच पहिले पोहोचलो असे सांगणारा पत्रकार मात्र त्यांना वारंवार प्रश्न विचारत असताना पाहणाऱ्यांना संताप येत होता. एक बाई आपल्या विमान अपघातात मृत झालेल्या आई-वडिलांना शोधायला आली. तिच्यासमोर माइक धरून काय साध्य केलं या लोकांनी? येथे वाचकांचा किंवा दर्शकांचा संताप शब्दांमध्ये बसत नाही. असं कोण करतो? कुठून येतो हा निर्लज्जपणा? काय पत्रकारिता एवढ्या खाली घसरली आहे की, शोकसमयी यांना प्रतिक्रिया हवीशी वाटते? दुःख विकण्याची ही स्पर्धा आहे का? आज माणूस रडतो, उद्या तो व्हायरल क्लिप बनतो. पुढच्या क्षणी स्क्रीनवर रडवणारा फुटेज बनतो. हे काय सुरू आहे?

तुमचं 'एक्सक्लुझिव्ह' हे तुमचं गर्वाच प्रमाणपत्र नाही, तर माणुसकी गहाण टाकून मिळवलेलं दया वाटावी असं यश आहे.

पत्रकारितेबाबतची कर्तव्ये, उत्तरदायित्व आणि वास्तवाची जी सखोल व व्यापक जाण पत्रकारितेचे रीतसर, व्यावसायिक शिक्षण नसतानादेखील अगोदरच्या पत्रकारांच्या पिढ्यांना होती; किंबहुना त्यांनीच पत्रकारितेला दिलेल्या वळणामुळेच पत्रकारितेची कर्तव्ये व उत्तरदायित्व काय असतात, त्याचा वस्तुपाठ घालून दिला गेला होता; ती जाण आज संवादमाध्यमांचे तटपुंजे शिक्षण घेऊन आलेल्या पुढच्या पिढ्यांमधून अजिबात दिसत नाही.

आज पत्रकारितेचं स्वरूप हे कुणी लवकर पोचतो?, कुणी जास्त चिखल दाखवतो? कुणी रडणाऱ्याचे शब्द पहिल्यांदा ऐकवतो? एवढ्यापुरतं उरलंय. दिवस भरभरून मरणाऱ्या लोकांची संख्या वाढत असताना, तुम्ही त्यांचं दुःख, त्यांचे फाटलेले कपडे, त्यांचा गलका त्या सगळ्याला फुटेजद्ध म्हणून वापरता?

तुम्हाला फक्त स्क्रीनवरचा इम्पॅक्ट दिसतो. पण तो कोणाच्या आयुष्याचा शेवट आहे, हे समजण्याइतकी संवेदनशीलता हरवली आहे का? त्यातच या सगळ्या शोकांतिकेला एक नव्या प्रकारचं धार्मिक फेसपेंट लावलं गेलं. कोणीतरी सांगितलं, त्या विमानात भगवद्गीता वाचली गेली. आणि ते पुन्हा पुन्हा दाखवलं गेलं. काय सांगायचंय यांना?

गीता वाचली, हे छान. पण माणूस वाचला का? ते विमान वाचलं का? श्लोक ऐकवले गेले. पण श्वास थांबले की नाही. मग ती गीता फक्त वाचली गेली की, दाखवली गेली? दुःखाचं प्रतीक की, टीआरपीसाठी वापरलेली धार्मिक ढाल?

हे गीतेचे श्लोक संकटात शांती देतात, हे मान्य. पण जेव्हा माणूस गमावल्याचं दुःख उरात धगधगत असतं, तेव्हा श्लोकांचे आवाजही टीव्ही चॅनलवरचे धंदे वाटायला लागतात.

गीता वाचली हे दाखवणं हे श्रद्धेचा अपमान नाही का? ज्यांनी गीता वाचली, त्यांच्या नशिबावरून आपण एवढं तरी शिकायला हवं ना की फक्त धार्मिक वाचन पुरेसं नाही, जीवनरक्षणाची यंत्रणा सुधारणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

खाजगी जीवनात जिथे जिथे म्हणून शक्य आहे, त्या त्या जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रांत हस्तक्षेप करणाऱ्या स्वभावाची, विधानबाजीने भरलेली नवीच पत्रकारिता आज उदयाला आलेली आहे.

पत्रकार आणि पत्रकारिता यांचे हे बदलते स्वभाव हा जगभरातच माध्यमाच्या नीतिमत्तेसंबंधांत दक्ष असणाऱ्यांसाठी चिंतेचाच विषय आहे. लोकशाही ज्या पद्धतीने पोखरली गेली आहे, त्याच वास्तवाचा पत्रकारिता हा भाग असल्याने लोकशाहीचा हा आधारस्तंभदेखील तसाच पोखरला गेला आहे, हे वास्तव नीट लक्षात घेतले पाहिजे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या, दृश्य माध्यमांच्या, इंटरनेट, मल्टीमीडियाच्या व माहिती महामार्गाच्या उपलब्धतेबरोबरच अंतर्बाह्य स्वरूप बदलत गेले. जनमत घडवण्याचे, इष्ट दिशेने ते वळवण्याचे व प्रभावीरित्या ते व्यक्त करवण्याचे सर्वाधिक महत्त्वाचे साधन म्हणून जगभर स्थान मिळवलेली अलिकडची पत्रकारितादेखील अंतर्बाह्य बदलत गेली. पण ती अशा वाटेने पुढे जाईल असे वाटले नव्हते.

या रिपोर्टर मंडळींनी त्यांच्या गुडघ्यात अडकलेल्या अक्कलला डोक्यात खेचून आणायची वेळ आली आहे. कारण आज जर तुम्ही दुःख कव्हर करत आहात, उद्या कोणीतरी तुमचं दुःख कन्टेंट म्हणून वापरणार तेंव्हा कळेल, माणुसकी काय असते.

कोणत्याही एखाद्या चॅनलचं नाव घेण्यात काही अर्थ नाही. कारण ही फक्त एका चॅनलची चूक नाही. ही संपूर्ण यंत्रणाची नैतिक दिवाळखोरी आहे. वार्तांकन कशाचे सुरु आहे तर, भगवद्गीतेचे पुस्तक स्फोटातून वाचले. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांच्या १२०६ या लकी नंबर बाबतची अंधश्रद्धा चघळली जातीये, या अपघातातून जो एकमेव प्रवासी सुदैवाने वाचला त्याच्या सीटचा नंबर ११ आहे. तो ११ नंबर या प्रवाशाचा लकी नंबर असल्याचा जावईशोध लावला गेला आहे.

अमक्या ढमक्या ज्योतिषाची पोस्ट, पुस्तकाचे फोटो दाखवले जात आहेत. विमानात पोहोचण्यास उशीर झाल्याने प्रवास न करु शकलेली महिला मला 'गणपती'ने वाचवले म्हणते. तेच वाक्य चघळले जात आहे. मग पती-पत्नी व त्यांची तीन चिमुरडे यांचा एक सेल्फी फोटो व्हायरल होत आहे. मग त्यांना वाचविण्यात देवाला यश का आले नाही, असे विचारणे योग्य ठरणार नाही.

मृतकांबाबत व त्यांच्या नातेवाईकांच्या अवस्थेबाबत कोणालाही काही पडलेली नाही. याआडून अनेक महत्वाच्या गोष्टी लोकांपासून लपवल्या जात आहेत. पत्रकारिता हे एक दर्शन आहे, पवित्र कर्तव्य, धर्म आहे, असे म्हणणे आज हास्यास्पद ठरले आहे. मानवी संस्कृतीचे संचित असलेले सारे आदर्श, ज्ञान, जनमाध्यमांच्या आजच्या प्रभावाच्या युगात दूर लोटले गेले आहे.

आज पत्रकारितेचे एक वेगळेच विश्व उदयाला आणले गेले आहे. लेखणीच्या जागी या, वाहिनी पत्रकारितेद्वने लोकांसमोर धरलेल्या माईकची स्थापना केली असून त्यामुळे अभ्यासू, चिंतनपर, विचारपूर्वक केलेल्या भाष्याची जागा अतिसामान्य व तत्काळ उमटणाच्या उथळ आणि दर्जाविहीन अशा भाविक प्रतिक्रियांनी घेतलेली आहे. पण लोकशाहीच्या सर्वच स्तंभाला हादरे बसल्यावर हा चौथा स्तंभ तरी दूर कसा राहील?

• • • • •

## चौथा आधारस्तंभ आता कोसळण्याच्या मार्गावर

स्पर्धा वाढवणाऱ्या उद्योगात पत्रकारितेचे रूपांतर होत गेले. पत्रकारितेचे, व्यवसायाचेदेखील व्होकेशन अथवा प्रोफेशनचे स्वरूप संपुष्टात येत जाऊन त्यास विविध स्वरूपाच्या माहितीच्या कच्च्या मालाच्या, विविध आकारातील, विविध चवीच्या, सहज स्वीकारार्ह व बाजाराच्या सोयीच्या अशा वस्तू, प्रॉडक्ट बनवणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील कारखान्याचे, उद्योगाचे स्वरूप प्राप्त होत गेले. पत्रकारितेस लागणारे शिक्षण, प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री, तंत्रज्ञान तसेच शिक्षण-प्रशिक्षणाच्या कोणत्याही सोयी अथवा तज्ज्ञ शिक्षक नाहीत, अशा ठिकाणीदेखील या शिक्षण-प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम चालवले जातात. या ज्ञानशाखेची परिपूर्ण तर सोडाच, परंतु किमान आवश्यक ज्ञान व कौशल्येदेखील पुरेशी आत्मसात होत नाही. माध्यमांचा, पत्रकारितेचा दर्जा घसरण्यास ज्या विविध बाबी कारणीभूत आहेत, त्यात या देशातील अशा अपुऱ्या व अर्धवट शिक्षण, प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा वाटा सर्वाधिक मोठा आहे. एकीकडे लोकशाही व्यवस्था ही ज्या कार्यपालिका, न्यायपालिका व कायदेमंडळ या तीन स्तंभांवर आधारलेले असते, तिचा चौथा आधारस्तंभ म्हणून पत्रकारितेला जगभरच स्थान प्राप्त झालेले असले तरी दुसरीकडे हा आधारस्तंभ आता कोसळण्याच्या मार्गावर उभा आहे. कोणत्याही प्रकारच्या सत्तेला, राज्यकर्त्यांना, व्यवस्थेला दुखापत होणार नाही, याची काळजी घेणारी, विवेक व विचारांऐवजी भावनेलाच तेवढे आवाहन करणारी ओतीव पत्रकारिता हे आजचे वास्तव आहे. उद्योगपती, व्यावसायिक हा जाहिरातदार वर्ग असल्याने व त्यांच्या आधारानेच अर्थकारण आज उभे असल्याने, या वर्गाच्या हितसंबंधाला बाधा पोहचणार नाही, याची दक्षता बाळगली जात आहे.

## माध्यमांनी आकाशाकडे लक्ष का दिले नाही?

कधीकधी एक प्रश्न मन पोखरत राहते, गरीबांचा जीव इतका स्वस्त का असतो? विमान अपघातात मरण पावलेला आकाश नावाचा मुलगा केवळ १४-१५ वर्षांचा होता. त्याची आई हॉस्पिटलबाहेर चहाची टपरी चालवत होती. आकाश तिथे डब्बा द्यायला आला होता आणि सावलीत थोडावेळ झोपी गेला. पण दुर्दैव! एअर इंडियाच्या विमानाचे एक अवशेष त्या रस्त्यावर कोसळले. आगीच्या ज्वाळा त्याच्यापर्यंत पोहोचल्या आणि आकाशने तिथेच शेवटचा श्वास घेतला. विशेष म्हणजे तो न विमानात होता, ना त्या होस्टेलमध्ये. तो रस्त्याच्या कडेला होता. त्याला वाचवायला धावलेली त्याची आई सुद्धा ५०% भाजली आणि ती सध्या रुग्णालयात मृत्यूसोबत लढतेय. आता प्रश्न असा पडतो की, या कुटुंबासाठी कोण पुढं येणार आहे? सरकार? टाटा? ते एक कोटी त्यांना देणार का? ज्यावेळी एखाद्याला एक कोटी दिले जाते, तेव्हा नाचत, टाळ्या वाजवत पोस्ट करणारे अशावेळी कुठे जातात? कुठल्या चॅनेलवर आहे या आकाशची बातमी? नेत्यांचे सिनेमॅटिक शॉट्स दाखवले गेले, भगवद्गीता वाचण्याच्या बातम्या चर्चेत आल्या, पण आकाशसारख्या निर्दोष, गरीब बालकाच्या मृत्यूवर कोण बोलणार? एका आईचा संसार एका सावलीत संपला. या देशात एक सामान्य गरीब माणूस जर रस्त्यावर शांतपणे डोळे मिटून झोपी गेला, तर त्याचं भविष्य आकाशातुन येणाऱ्या ज्वाळांवर अवलंबून असतं का? हा केवळ अपघात नव्हे, हा एक सामाजिक प्रश्न आहे. गरीबाच्या जीवाला किंमत आहे का? की तो फक्त आकड्यांमध्ये हरवून जातो? माध्यमांनी अशा बातम्यांना पुढे आणून न्याय दिला पाहिजे

# चिंताजनक विमान दुर्घटना

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ - ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली.

या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे.

अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते.

२०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे.

हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते.

खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही.

पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत.

वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे, हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात.

तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे.

भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता.

आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमवावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे.

काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे.

तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे.

सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

■ ■ ■



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

## पारंपरिक विवाह संस्कार वाचवण्याची गरज!

वाचक लिहितात

विवाह हा हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी एक महत्त्वपूर्ण संस्कार आहे. विवाह म्हणजे एक पवित्र बंध! या संस्कारातील वरमाला, कंकणबंधन, मंगलाष्टक, सप्तपदी, होम, कन्यादान या विधींना धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या संस्काराचे बदलणारे स्वरूप पाहता हा धार्मिक संस्कार कमी आणि दिखाऊपणाचा सोहळा अधिक वाटू लागला आहे. सध्या विवाहात संगीत रजनी, वधूला उचलणे, हळद, मेंदी यांसाठी वेगवेगळे समारंभ आयोजित केले जातात. या सगळ्या गोष्टींमध्ये धार्मिक विधींचे मूळ स्वरूप लोप पावत आहे. पारंपरिक हिंदू विवाहसंस्कृतीला दूर करून पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण होताना दिसते.

यावर आळा बसण्यासाठी अमळनेर येथील मंगळग्रह मंदिरात सहस्रो भाविकांनी शपथ घेतली. ही बातमी वाचण्यात आली. समाजातील अनुचित प्रकार थांबवण्यासाठी भाविकांना अशी शपथ देण्याचे क्रांतिकारी पाऊल मंगळग्रह मंदिर प्रशासनाने उचलले आहे. यासाठी मंदिर प्रशासनाचे अभिनंदन!

■ सौ. वर्षा आवदे
नागपूर.

# अनधिकृत फेरीवाल्यांच्या समस्येतून मुक्ती केंव्हा?

राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांची समस्या जटील बनत चालली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई सारख्या गर्दीच्या शहरांतील जवळपास सर्वच रेल्वे स्थानकांचा आजूबाजूचा परिसर अनधिकृत फेरीवाल्यांनी गिळंकृत केला आहे त्यामुळे शासनाने ठरवलेले फेरीवाला धोरण नक्की कोण राबवते आहे हा प्रश्न शहरांतील नागरिकांना पडला आहे.

रेल्वे स्थानक परिसरातील पदपथ प्रशासनाने नागरिकांना चालण्यासाठी बनवले आहेत की फेरीवाल्यांना आपली दुकाने थाटण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे हासुद्धा प्रश्न आज पडतो आहे. 'मुंबई महानगरपालिका, म्हाडा, पोलीस यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे.

पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का? अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये आपली उद्विग्नता व्यक्त केली होती. आज एक वर्षानंतर सुद्धा प्रशासनाने त्यावर कारवाई केलेली दिसत नाही.

वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे, रेल्वे स्थानक, बस स्थानक आदी गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असणारे पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी चालायचे कोठून असा प्रश्न प्रतिदिन निर्माण होत आहे.

त्यातच या फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे. महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

२०१७ साली मुंबईतील एल्फिन्स्टन( आताचे प्रभादेवी) रेल्वे स्थानकाच्या पुलावर झालेल्या दुर्घटनेतून बोध घेऊन पालिका प्रशासनानेही मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर पांढरे पट्टे आखून त्यांच्या आतील परिसरात फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करणारा नियम बनवला. त्यानंतर या पट्ट्याच्या आत फेरीवाले बसणार नाहीत याची काळजी प्रशासनाकडून काही दिवस घेण्यात आली; मात्र थोड्याच दिवसांत हा नियम बासनात बांधून रेल्वे स्थानकाजवळ पुन्हा फेरीवाले बसू लागले.

रेल्वे स्थानकांजवळ रस्त्यांच्या दुतर्फा पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे लोकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. गर्दीच्या वेळी रस्त्यांवरील वाहतुकीच्या कोंडीमुळे त्यांतून वाट काढताना अक्षरशः नाकीनऊ येतात. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी अधूनमधून महापालिकेची गाडी परिसरात फिरते मात्र ती येणार असल्याची बातमी फेरीवाल्यांना आधीच मिळाल्याने ते आपला माल झाकून ठेवून दूर निघून जातात.

गाडी तेथून निघून गेली कि हे अनधिकृत फेरीवाले पुन्हा त्या ठिकाणी आपले बस्तान मांडतात. मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये बांगलादेशी तरुण मोठ्या प्रमाणात असल्याचे मध्यंतरी उघड झाले होते.

या फेरीवाल्यांना बस्तान मांडण्यासाठी पदपथांवर जागा उपलब्ध करून देणे, त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन उपलब्ध करून देणे, भांडवल उपलब्ध करून देणे, पोलीस आणि महापालिका यांच्या कारवाईपासून त्यांना वाचवणे यासाठी प्रत्येक रेल्वेस्थानक परिसरात म्होरके कार्यरत असून या म्होरक्यांचे महापालिका अधिकारी, स्थानिक पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी आर्थिक हितसंबंध असतात ज्यामुळे त्यांचे हे धंदे वर्षानुवर्षे बिनदिक्कतपणे सुरु आहेत.

मुंबई-ठाण्यासारख्या मराठीबहुल शहरांत बहुतांश फेरीवाले हे परप्रांतीयच आढळून येतात. हे अनधिकृत परप्रांतीय फेरीवाले त्यांच्याकडे येणा ?या ग्राहकांसोबत अरेरावीने वागतात, त्यांच्याकडून वस्तू खरेदी न केल्यास ग्राहकांशी विनाकारण वाद घालतात. या मुजोर फेरीवाल्यांकडून स्थानिक ग्राहकांना आणि रहिवाशांना मारहाण झाल्याच्या घटना यापूर्वी बदलापूर, ठाणे, घाटकोपर यांसारख्या ठिकाणी घडल्या आहेत.

सर्वसामान्य नागरिकांपेक्षा अनधिकृत फेरीवाल्यांची अधिक काळजी घेणाऱ्या महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाला न्यायालयाच्या आदेशानंतरही या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवायचे नसेल तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भविष्यात सैन्याला पाचारण करण्याची वेळ आल्यास आश्चर्य वाटायला नको!

■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## दररोज सकाळी गरम पाणी प्यायल्याने लिव्हर खरंच साफ होतं का?





आजकाल लोक आरोग्याबाबत खूप जागरूक झाले आहेत. सोशल मीडियापासून ते आजूबाजूच्या परिसरात आपल्याला विविध प्रकारचे घरगुती उपाय ऐकायला मिळतात. त्यापैकीच हा एक उपाय आहे तो म्हणजे दररोज सकाळी रिकाम्या पोटी गरम पाणी पिणे. त्याचे अनेक फायदे आहेत.

असे म्हटले जाते की ते लिव्हर स्वच्छ करते आणि शरीराला विषारी पदार्थांपासून मुक्त करते, बरेच लोक हे देखील मानतात की फक्त गरम पाणी प्यायल्याने खरोखरच लिव्हर स्वच्छ होते.

एम्समधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागाचे डॉ. सौरभ स्पष्ट करतात की लिव्हर हा आपल्या शरीराचा एक अतिशय महत्त्वाचा अवयव आहे. तो शरीरातील चयापचय नियंत्रित करतो, रक्त स्वच्छ करतो, विषारी पदार्थ काढून टाकतो, पचनास मदत करतो आणि जीवनसत्त्वे आणि खनिजे साठवतो. लिव्हर शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ आपोआप फिल्टर करतो आणि मूत्र आणि घामाद्वारे बाहेर काढतो. म्हणून, लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी, त्याला जास्त काम करायला लावू नये, परंतु त्याची काळजी घेतली पाहिजे.

गरम पाणी लिव्हरला डिटॉक्स करत नाही. ते म्हणतात की गरम पाणी पिण्याचे निश्चितच काही फायदे आहेत. जे खालीलप्रमाणे आहेत.

**पचनसंस्था निरोगी राहते :** गरम पाण्याने पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठता सारख्या समस्या कमी होतात.

**चयापचय वाढतो :** सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी प्यायल्याने शरीराची चयापचय क्रिया वाढते.

**डिहायड्रेशन प्रतिबंध :** कोमट पाणी शरीराला हायड्रेट ठेवते, ज्यामुळे अवयवांचे कार्य सुधारते.

**सौम्य डिटॉक्स प्रभाव :** कोमट पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास थोडी मदत करते.

परंतु, फक्त गरम पाणी पिऊन लिव्हर पूर्णपणे स्वच्छ करता येत नाही. गरम पाणी पिल्याने लिव्हर निरोगी राहण्यास थोडी मदत होऊ शकते, परंतु लिव्हर पूर्णपणे स्वच्छ करण्याचा हा जादूचा मार्ग नाही. लिव्हर स्वतःच स्वतःला स्वच्छ करण्याचे काम करते. गरम पाणी शरीराच्या उर्वरित भागात स्वच्छता प्रक्रियेला थोडेसेच समर्थन देते. जर एखाद्या व्यक्तीला असे वाटत असेल की फक्त गरम पाणी पिऊन तो फास्ट फूड, अल्कोहोल किंवा इतर वाईट सवयींमुळे होणारे लिव्हरचे नुकसान टाळू शकतो, तर हा गैरसमज आहे. ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### धन्य त्या माता जिजाऊ..!

दिवसेंदिवस संस्कारांचा
होत चाललाय लोप
भावी पिढी पासुन तरी
कशी ठेवणार होप ..!

माँ जिजाऊने जर
घडविला नसता छत्रपती
तर आपली वंशावळ
काळाआड गेली असती..!

मोबाईल वेड्या महिलांनो
मुलांसाठी काढा ना वेळ
नाहीतर वृध्दाश्रमात
राहण्याची येईल वेळ !

## आझाद मैदानावरील आंदोलनाला जिल्ह्यातील शिक्षकांचा पाठिंबा

**गडचिरोली:** वाढीव टप्प्याचे अनुदान मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विना-अनुदानित शाळा कृती समितीच्या माध्यमातून ५ जूनपासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला विनाअनुदानित शाळा कृती समिती पाठिंबा देत या आंदोलनात जिल्ह्यातील विनाअनुदानित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष मुरली कवाडकर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी १४ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णय तत्कालीन राज्य सरक. रने काढला होता, त्यानंतर विधिमंडळाची २ अधिवेशने पार पडली. परंतु, आर्थिक तरतुद मात्र झाली नाही. परिणामी, अंशतः अनुदा. नित शिक्षकांना पुढील वाढीव टप्प्याचे अनुदान मिळू शकले नाही. परिणामी, राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड आक्रोश व नैराश्य निर्माण झालेले आहे. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जूनपासून आझाद मैदानात आंदोलन पुकारले आहे.

## कर्करोगापासून दुर राहायचे असेल तर वाईट व्यसन टाळा

### आ. धर्मरावबाबा आत्राम यांचे नागरिकांना आवाहन

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. १६ :** कर्करोगासारख्या आजारापासून दूर राहायचे असेल तर कुठलेही व्यसन करू नका, असे आवाहन माजी राज्यमंत्री तथा आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी केले.

माजी राज्यमंत्री तथा विद्यमान आ. डॉ. धर्मरावबाबा आत्राम यांच्या मार्गदर्शनात व युवा नेते हर्षवर्धन बाबा आत्राम तसेच डॉ. मिताली आत्राम यांच्या पुढाकारात. न अहेरी येथील वासवी सेलिब्रेशन हॉलमध्ये शनिवारी (दि.१४) व १५ या २ दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि.१४ ) या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आ. धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास सिनेट सदस्य तनुश्री आत्राम, युवा नेते हर्षवर्धन बाबा आत्राम, डॉ. मिताली आत्राम, डॉ. अविनाश तिप्पानी, डॉ. सुमित्रा तिप्पानी, डॉ. गौरव विशाल, डॉ. मेघना, राकाँचे अहेरी तालुकाध्यक्ष नागेश मडावी, सिरा. चा तालुकाध्यक्ष मधुकर कोल्लूरी, न. पं. उपाध्यक्ष शैलेश पटवर्धन, ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीकांत मद्दीवार, सिरोंचाचे नगरसेवक सतीश भोगे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पुष्पा अलोने, जिल्हा कार्याध्यक्ष सारिका गडपल्लीवार उपस्थित होते.



**आ. आत्राम यांनी साधला रूग्णांशी संवाद**
२ दिवसीय आरोग्य शिबिराचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने खेड्यापाड्यातून आलेल्या रुग्णांना बघून आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी स्वतः रुग्णांजवळ जाऊन त्यांच्याशी आस्थेने संवाद साधत आजाराविषयी माहिती जाणून घेतली. त्यांनी प्रत्यक्षात सुरू असलेल्या आरोग्य तपासणीची पाहणी केली.

अहेरी उपविभागातील नागरिकांना विविध आजारावर उपचार करण्यासाठी चंद्रपूर, नागपूर किंवा तेलंगणा राज्यात जाणे परवडत नसल्याने या भागातील रुग्णांवर योग्य उपचार व्हावा, या उदात्त हेतूने स्नेहादेवी धर्मरावबाबा आत्राम बहुउद्देशिय संस्था अहेरीद्वारा विविध तालुक्यात मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिराचे आयोजन केले जात आहे. मागील ५ वर्षांपासून नेत्र तपासणी शिबिर, कर्करोग तपासणी शिबिर घेऊन तसेच इतर गंभीर आजार असलेल्या रुग्णांना मोठमोठ्या शहरात पाठवून मोफत उपचार देण्याचे काम या संस्थेद्वारे केले जात आहे. सिरोंचा, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा आणि अहेरी तालुक्यातील शेकडो रुग्णांवर यापूर्वी देखील उपचार झाले आहेत. आपल्या भागात मोठ्या प्रमाणात कर्करोगाचे रुग्ण आढळत असल्याने डॉ. मिताली आत्राम यांनी तेलंगाणा राज्यातील वरंग येथील प्रतिमा कॅन्सर इस्टिट्यूटला भेट देऊन आपल्या भागात कर्करोग तपासणी सोबतच इतर रुग्णांची आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने आमदार धर्मरावबाबा आत्राम यांच्या मार्गदर्शनात स्नेहादेवी धर्मरावबाबा आत्राम बहुउद्देशीय संस्था तथा प्रतिमा कॅन्सर इस्टिट्यूट वरंगल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी अहेरीत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद दिसून आला. अहेरी उपविभागातील शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. अत्याधु. निक तंत्रज्ञानाचा वापर करून शि. बिरात आरोग्य तपासणी करण्यात आली. संचालन सुरेंद्र अलोने यांनी केले.

**वेळेवर आरोग्य तपासणी गरजेची**
मागील अनेक वर्षांपासून वरंगल येथे प्रतिमा कॅन्सर इनस्टिट्यूट चालविले जात आहे. या इनस्टिट्यूटमध्ये तेलंगाणा लगत असलेल्या छत्तीसगड राज्यातील बिजापूर, भोपा महाराष्ट्रातील गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील असंख्य रुग्ण दाखल होत आहे. या कॅन्सरचे प्रमाण अधिक आहे. मात्र, रुग्ण हे अंतिम क्षणी दाखल होतात. असे न करता लक्षणे आढळताच तपासणी करून उपचार घेण्याचा सल्ला डॉ. अविनाश तिप्पानी यांनी दिला.

## ग्रामीण भागातही वाढली ऑनलाइन व्यवहाराची क्रेझ

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १६ :** ग्रामीण भागातही वाढली ऑनलाइन व्यवहाराची क्रेझ

गडचिरोली: बदलत्या काळानुसार नागरिक झपाट्याने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. त्यामुळे शहरासह गावखेड्यामध्येही ऑनलाइन व्यवहार करण्याची क्रेझ झपाट्याने वाढत आहे. लहान-मोठी खरेदी केल्यानंतर विक्रेत्याला रोकड न देता वेगवेगळ्या माध्यमातून ऑनलाइन भरणा केला जात असल्याचे चित्र सगळीकडे दिसून येत आहे.

मोबाइलच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करण्यासाठी फोन पे, गुगल पे, पेटीएम, भीम ॲप अशा ॲपचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. अपवादात्मक मोबाइलधारक वगळता बहुतांश मोबाइलधारकांनी वेगवेगळे ॲप डाऊनलोड करून घेतले आहेत. मोबाइलच्या माध्यमातून पेमेंट करणे नागरिक. ांना सोयीचे झाले आहे. त्यामुळे पैसे हरविण्याची भीती नसते. शिवाय खिसेकापूंचीही भीती राहत नाही. म्हणून यूपीआय अंतर्गत येणाऱ्या सर्व प्लॅटफॉर्मचा वापर मोबाइल धारकांकडून मोठ्या खुबीने केला जात आहे. अनेक जण रोखीचे व्यवहार करण्याऐवजी फोन पे, गुगल पे, पेटीएमसह अन्य ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करून कॅशलेस, ऑनलाइन व्यवहार करण्यास पसंती देत आहेत. ऑनलाइन व्यवहारामुळे नागरिकांची मोठी सोय झाली आहे. त्यामुळे बँकेत जाऊन वेळेचा अपव्यय करण्याची इच्छा नागरिकांमध्ये राहिलेली नाही. परिणामी बँकेत येणाऱ्यांची संख्याही कमी झाली आहे. याचा सर्वाधिक परिणाम एटीएमवर झाला आहे. शहरातील एटीएम केंद्रावर पैसे काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी आता कमी होऊ लागली आहे. एकेकाळी रोकड काढण्यासाठी ग्राहकांनी गजबजलेल्या एटीएममध्ये सध्या शुकशुकाट असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

## सोलरपंपाचे शेड उडाले, भरपाई केव्हा मिळणा?

गडचिरोली: आरमोरी तालुक्याच्या वडधा परिसरात सोमवारी (दि.९) रात्रीच्या सुमारास झालेल्या वादळासह झालेल्या पावसाने शेतातील व घरगुती साहित्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नागरिकांवर मोठे संकट ओढवले आहे. पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नरोटीमाल येथील शेतकरी मोरेश्वर चलीरवार यांचे सोलर पंप व गुरांच्या शेडचे पत्रे उडून बैल जखमी झाले. डार्ली येथील आशिष सडमाके यांच्या शेतातील सोलर पंप पूर्णपणे उडून पत्रे अस्ताव्यस्त झाली. तसेच मारुती सहारे ख्रिश्चन करकाडे व गडचिरोली तालुक्यातील टेंभा येथील शेतकरी नामदेव आजबैले यांचेसुद्धा मोठ्या प्रमाणात सोलर पंपाचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या वतीने तलाठी व तहसीलदारांकडे याबाबत लेखी निवेदन देण्यात आले आहे.

## 'त्या' पुलाचे काम शीघ्रगतीने पूर्ण करा

### खा. नामदेव किरसान यांचे निर्देश



**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. १६ :** खा. डॉ. नामदेव किरसान यांनी कुरखेडा तालुक्याला भेट दिली. यावेळी काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तालुक्यातील विविध समस्यांचे निवेदन सादर केले. यावेळी खा. डॉ. किरसान यांनी सती नदीवरील नवीन पूल बांधक. ामाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून लवक. रात लवकर बांधकाम करण्याच्या सूचना केल्या. कुरखेडा येथील शासकीय विश्रामगृहात काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खा. डॉ. नामदेव किरसान यांची भेट घेतली. येथील समस्यांबाबतचे निवेदन दिले. यावेळी खा. डॉ. नामदेव किरसान यांनी परिसरातील विविध समस्यांवर चर्चा केली.

यावेळी सती नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलाबद्दल पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून माहिती जाणून घेतली. पावसाळ्यात नागरिकांना येणाऱ्या समस्या लक्षात घेता खा. डॉ. किरसान यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी मोबाइलवरून संपर्क साधला आणि पाऊस सुरू होण्यापूर्वी पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यावेळी जि. प.चे माजी उपाध्यक्ष तथा काँग्रेस कमेटीचे तालुकाध्यक्ष जीवन नाट, जिल्हा उपाध्यक्ष जयंत हरडे, माजी पं. स. सभापती गिरीधर तितराम, सिराज पठाण, आनंदराव जांभूळकर, उस्मान पठाण, पुंडलिक निपाने, आशा मडावी, प्रतिभा सिडाम, तुकाराम मारगाये, भावेश मुगनकर, अरुण नैताम, रोहित ढवळे, आशिफ शेख, धोडणे, नीकेश भेले, प्रांजल धाबे. कर, धलदास उईके, पांडुरंग लजे, नीलकंठ आलाम, शहीद शेख, पुंडलिक दादगाये, रुखसार शेख, बबलू शेख तसेच काँग्रेस पदाधिक. ारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गावात दारूविक्री केल्यास कायदेशीर कारवाई

### काकडयेली ग्रामसभेत दारूबंदीचा आढावा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १६ :** धानोरा तालुक्यातील दुर्गम भागात वसलेल्या काकडयेली येथे मागील ६ वर्षांपासून दारूविक्री बंद होती. मात्र, मागील ४ ते ५ महिन्यात चोरून लपून दारूविक्री गावातील मुजोर विक्रेते करत होते. हे संघटनेच्या लक्षात येताच व पूर्वी गावात दारू विक्रीचे प्रमाण अधिक होण्याचा धोका वेळीच ओळखून गावात ग्रामसभा आयोजित करण्यात आली. ग्रामसभेत अवैध दारूविक्री बंदीचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. गाव परिसरात दारूविक्री करताना आढळून आल्यास संबंधित विक्रेत्यावर पोलिस विभागाच्या मार्फतीने कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा गावातील दारूविक्रेत्यांना देण्यात आला आहे.



ग्रामसभेत गावातील अवैध दारूविक्री बंदीसाठी गावातील महिला, पुरुषांनी पुढाकार घेतला. तसेच दारूसंबंधी समस्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी गावातील बहुसंख्य महिला पुरुष सहभागी होऊन दारू संबंधित चर्चा करीत आमचे गाव या अगोदर दारूविक्री मुक्त होते. परंतु, काही मुजोर विक्रेत्यांनी गावाबाहेर दारूविक्री चालू करून आमच्या गावाचा आदर्श गाव सन्मान अडचणीत आणला. यामुळे गावातील वातावरण बिघडत चालले आहे, इत्यादी अडचणी ग्रामसभेत मांडल्या. दरम्यान गावचे सरपंच, पोलिस पाटील, ग्रामसभा अध्यक्ष, सचिव तसेच प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत दारूबंदीचा ठराव पारित करण्यात आला. यानंतर गावात अवैध दारूविक्री केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आवाहनसुद्धा करण्यात आले.

सभेत मुक्तीपथ तालुका संघटक राहुल महाकुलकर, तालुका प्रेरक बुधा पोरटे, शीतल गुरनुले, समीक्षा कुळमेथे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच माया उसेंडी, ग्रामसभा अध्यक्ष गणसू दुगा, सचिव रमेश किरको, पोलिस पाटील घनश्याम उसेंडी, उमेश किरको, गावसंघटन अध्यक्ष सुनीता आतला, सचिव सोनी दुगा, रेखा पदा यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख पदी संदीप ठाकूर

**शहर प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १६ :** शिवसेना (एकनाथ शिंदे गट) गडचिरोली जिल्हाप्रमुख पदावर नुकतेच शिवसेनेच्या बंधनात अडकलेले आरमोरी तालुक्यातील संदीप ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली. रविवार (१५) रोजी भंडारा येथील मंगलमूर्ती सभागृहात आयोजित पूर्व विदर्भातील पदा. धिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात शिवसेनेचे उपनेते आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.



नवनियुक्त शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदीप ठाकूर हे राष्ट्रवादी आरमोरी तालुका अध्यक्ष राहिले होते. तर आज विदर्भातील सरपंच संघटनेचे विदर्भ अध्यक्ष सुद्धा आहेत. त्यांना पक्ष वाढीसाठी व संघटनात्मक बांधणीचा दाडगा अनुभव आहे. सदरची नियुक्ती उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व श्रीकांत शिंदे यांचे सूचनेनुसार शिवसेना उपनेते आमदार नरेंद्र भोंडेकर, गडचिरोली चिमूर लोकसभा शिवसेना संपर्कप्रमुख तथा माजी आमदार सहसराम कोरेटे यांनी केली. त्यांच्या नियुक्तीबद्दल शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## निंबा टेकाम वनौषधीने करतात रूग्णांची निःस्वार्थ सेवा

**शहर प्रतिनिधी**
**आरमोरी दि. १६ :** आरमा. ेरी तालुक्यातील वैरागड येथील जुना बसस्थानकजवळील कुंभार मोहल्ल्यातील रहिवाशी असलेले निंबा दागो टेकाम (६०) साध्य असाध्य अशा विविध आजारावर वनस्पती औषधीने रुग्णांची निःस्वार्थ सेवा करीत आहेत.

वडिलोपार्जीत रुग्णांना सेवा देण्याचा मानस बाळगणाऱ्या टेकाम परिवाराची असलेले कॅन्सर, सिकलसेल, सर्पदंश, श्वान दंश, लकवा, कावीळ, किडनी स्टोन, मूळव्याध, घटसर्प, मिरगी, डबल निमोनिया, कुष्ठरोग, मूत्रखडा, हड्डी उपचार, पोटातले विकार तसेच अनेक रोगावर वनस्पतीद्वारे आयुर्वेदिक उपचार करीत असतात. यासाठी निंबा टेकाम जंगलात जाऊन रुग्णाच्या उपचाराला आवश्यक असलेल्या वनस्पतीची ओळख पटवून मूळ, पान, फुल, साल आणून कशा, भुकटी आणि गोळ्या तयार करून आजाराची ओळख पटवून १४ ते ३० दिवस रुग्णाला औषधाची मात्रा देतात. त्यांच्या आयुर्वेदिक उपचाराने गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रप. ूर, नागपूर तसेच विविध भागातून अनेक रुग्ण उपचार घेऊन बरे झालेले आहेत. कोणताही आजार असल्यास ९४२०४२१७४६ या भ्रमणध्वनीवर संपर्क करून त्याठिकाणी जाऊनसुद्धा उपचार केला जातो.

## आर्य वैश्य महिला महासभेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. १६ :** आर्य वैश्य समाजातील दहावी, बारावी व इतर शाखेतील पदवी पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम नुकताच पार पडला.

अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा जयश्री वायलालवार होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्षा आरती भिमनवार, जिल्हा सचिव श्रद्धा बच्चूवार तालुकाध्यक्षा कविता बंडावार, सचिव रूपा चेलीयालवार, कोषाध्यक्षा नम्रता मार्तीवार, प्रसिद्धी प्रमुख कल्याणी चिमड्यालवार, वर्षा येरावार, जिल्हा उपाध्यक्षा सारिका तातावार उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माता कन्यका परमेश्वरीच्या प्रतिमेला दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून करण्यात आली. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा घेण्यात आला. यात एमबीबीएस वैष्णवी मार्तीवार हिचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच एमबीबीएस श्रीनाथ बंडावार, बीएएमएस गायत्री बुर्लावार, एमएस इन मार्केटिंग वैष्णवी गण्यारपवार, बीटेक मेहूल पोशट्टीवार, बीए शितल मार्तीवार यांचा सत्कार करण्यात आला. दहावीतून संयुक्ता आल्लुरवार, बारावीतून जय वायलालवार व ईशा पालारपवार यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. बारावीतून आणखी दहा विद्यार्थ्यांचा व दहावीतून ६ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संचालन शीतल मार्तीवार यांनी केले, तर आभार शीतल बुर्लावार यांनी मानले. यशस्वीतेसाठी चामोर्शी तालुका आर्य वैश्य महासभेच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला सर्व समाज बांधव उपस्थित होते.



## २२ हजारांवर वृक्षांची होणार कत्तल!

### सोहले येथील लोहखाण प्रस्तावित प्रकल्प

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १६ :** मागील काही वर्षांपासून कोरची तालुक्यातील सोहले येथील लोहखाण प्रकल्पाला स्थानिकांचा विरोधानंतरही सुरुवात झाली आहे. लोहखनिज काढण्याकरिता रस्ता तयार करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरु आहे. सदर रस्ता तयार करण्यासाठी शेकडो झाडांची कत्तल करून झाडांना तिथेच माती खाली गाडण्यात आल्याची माहिती आहे. सदर लोहखाण हे अजंता मिनरल्स या कंपनीला मंजूर असून, मिळालेल्या माहितीनुसार प्राथमिक स्तरावर ११ हजार टन दरवर्षीप्रमाणे ५ वर्षांसाठी एकूण ५५ हजार टन खोदकामाची परवानगी प्राप्त झाली आहे. गावातील नागरिकांनी विरोध केल्यामुळे सदर कंत्राटदाराने काही लोकांच्या खाजगी जमीन भाड्याने घेऊन त्यांच्या जमिनीवरून मार्ग काढला.

सदर मार्ग काढताना शेकडो झाडांची कत्तल करण्यात आली आहे. आतापर्यंत सदर परिसरात २ वेळा एक्सप्लोरेशन टेस्टिंग करण्यात आली. ज्यामध्ये १०० मिटरपर्यंत खोलवरचे सॅम्पल घेण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार अजून ३ वेळा परिसरात एक्सप्लोरेशन टेस्टिंग करण्यात येणार असून, या टेस्टिंगचा उद्देश म्हणजे कुठल्या क्षेत्रात किती प्रमाणात लोह खनिज आहे, याची माहिती मिळणार आहे. कोरची तालुक्यातील बहुतेक नागरिक हे वनसंपत्तीवर आपला उदरनिर्वाह करीत असून, या २२ हजार वृक्षामध्ये बहुतेक प्रमाणात सागवान, मोह, आंबा, चिंच, जांभूळ व अनेक औषधी गुणधर्म असलेली झाडे आहेत. या २२ हजार झाडांवर कुऱ्हाड चालणार म्हणून निसर्गाला देव मानून निसर्गाची पूजा करणारा आदिवासी आता कुठेतरी हतबल झाल्याचे दिसून येत आहे.



**आ. मसराम यांनी दिली भेट**
आ. रामदास मसराम यांनी सोहले येथील लोहखाण प्रकल्पाच्या स्थळाला भेट देऊन पाहणी केली. अशाप्रकारे होणाऱ्या निसर्गाच्या ऱ्हासामुळे आमदारांनी नाराजी व्यक्त केली. आतापर्यंत कत्तल करण्यात आलेल्या झाडांची चौकशी करण्याचे आदेशसुद्धा संबंधित विभागाला दिले. कुरखेडा तालुकाध्यक्ष जीवन नाट, माजी यावेळी कोरची तालुक. ाध्यक्ष मनोज अग्रवाल, सभापती परसराम टिकले, रामसूराम काटेंगे, विठ्ठल शेंडे, वसिम शेख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गावकरी उपस्थित होते.

यावर्षी दिवाळीनंतर या लोहखाण प्रकल्पामध्ये खोदकाम सुरू होण्याची शक्यता आहे. अजून ३ एक्सप्लोरेशन टेस्टिंग करण्याचे बाकी आहे. ६५ हेक्टरच्या या क्षेत्रामध्ये एकूण लहान मोठे असे अंदाजे २२ हजार झाडे आहेत.

– **सचिन करडभाजने,** माइनिंग अभियंता, सोहले लोहखाण प्रकल्प

## ४० वर्षानंतर माजी विद्यार्थीनी शाळेचे प्रांगण पुन्हा गजबले

### स्नेहमीलन सोहळा: शिवाजी हायस्कूलमध्ये गुरुजनांचा सत्कार

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. १६ :** शिवाजी हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात एका ऐतिहासिक स्नेहमीलन सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधले. १९८३-८४, १९८४-८५ आणि १९८५-८६ या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ४० वर्षानुतर एकत्र येत आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. या भव्य स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन १९८५ बॅचच्या मनीषा भरणे आणि सविता वाघरे या २ मैत्रिणींनी उत्साहाने आणि कसा. शीने केले. या सोहळ्यात जवळपास १५० माजी विद्यार्थी आणि त्यांचे गुरुजन एकत्र आले. ज्यामुळे शाळेचे प्रांगण पुन्हा एकदा गजबजले.



१९८५ च्या बॅचच्या मनीषा भरणे आणि सविता वाघरे यांनी या स्नेहमिलनाची संकल्पना मांडली. त्यासाठी महिन्यांपासून नियोजनाला सुरुवात केली. त्यांनी प्रथम आपल्या संपर्कातील वर्गमित्रांना जोडले आणि त्यांच्यामार्फत इतर मित्रांचे संपर्क मिळविले. शनिवारी ४ महिन्यापासून नियोजनाला सुरूवात केली. त्यांनी प्रथम आपल्या संपर्कातील वर्गमित्रांना जोडले आणि त्यांच्यामार्फत इतर मित्रांचे संपर्क मिळविले. शनिवार १४ जून रोजी शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणात सकाळी १० वाजता दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची विधिवत सुरुवात झाली. सविता वाघरे यांनी स्वागतपर भाषणात सर्व उपस्थितांचे आभार मानले. या स्नेहमिलनामागील उद्देश विशद केला. सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे उपस्थित गुरुजनांचा सपत्नीक सत्कार १९८३ ते १९८६ या काळात शिकवणाऱ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडवण्यात मोलाची भूमिका बजावली होती. त्यांच्या योगदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी गुरूजनांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी अनेक गुरूजनांनी आपल्या विद्यार्थ्यांचे यश आणि हा स्नेहमिलन सोहळा पाहून आनंद व्यक्त केला. 'आज माज्या विद्यार्थ्यांनी इतक्या वर्षानंतर एकत्र पाहून मला खूप अभिमान वाटतो, असे एका गुरूजनांनी सां. गितले.

कार्यक्रमा दरम्यान माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील मजेदार आणि भावनिक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे संचालन सविता भरणे आणि दामोदर अंबादे यांनी केले. यावेळी काही माजी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. स्नेहमिलनाचा समारोप भोजन समारंभाने झाला.

**सहभोजनाचा घेतला आनंद**
माजी विद्यार्थी आणि गुरुजनांनी एकत्र जेवणाचा आनंद लुटला. श्हा सोहळा आमच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण आहे. आम्ही पुन्हा एकदा लहान मुलांसारखे वर्गात बसलो, असे सविता वाघरे यांनी सांगितले. शिवाजी हायस्कूलच्या या स्नेहमिलनाने सर्वांना एक गोष्ट शिकवली की, मैत्रीण गुरुजनांचे मार्गदर्शन यांच्या बंधनाला काळाची बंधने नसतात. ४० वर्षांनंतरही या बंधनाची ताकद आणि प्रेम कायम आहे, हे या सोहळ्याने सिद्ध केले.

## लाहेरी परिसरातील कव्हरेज विस्कळीत

**तालुका प्रतिनिधी**
**भामरागड दि. १६ :** जिल्ह्याचा अतिदुर्गम क्षेत्रात मोडणाऱ्या भामरागड तालुक्यातील संवे. दनशील अशा लाहेरी परिसरात मागील काही दिवसांपासून वारंवार कव्हरेज खंडित होण्याचे प्रकार धडून येत आहे. यामुळे मोबाइलधारक त्रस्त झाले आहेत. लाहोरी येथे ८ वर्षापूर्वी भ्रमणध्वनी मनोरा उभारण्यात आला. परंतु, हा मनोरा नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने बंद असतो. मोबाईलवर संपर्क साधल्यास एका बाजूने आवाज असल्यास दुसरीकडून आवाज येत नाही. लाहेरी येथे पोलिस दलासह विविध विभागाचे शासकीय कार्यालये आहेत. मात्र, इंटरनेट सेवा विस्कळीत राहत असल्याने ऑनलाइन कामे प्रभावित होत आहे. यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



# खमंग बटाटा पुलाव

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्ही टॉमेटो राईस, कोबी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील. आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडीअडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून एका भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला. मिनिटभर परता. मग यात पुदिना-कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. बटाटा पुलाव तयार आहे. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.

# जोश

# प्लास्टिक कचऱ्यात शोधले सोने!

अचिव्हर

प्लास्टिक कचरा पर्यावरणासाठी एक गंभीर आव्हान बनला आहे. दिल्लीतील मोहम्मद सुहेल नावाचा एक तरुण उद्योजक या कचऱ्यापासून लाखो रुपये कमवत आहे. या तरुणाने प्लास्टिक प्रदूषणाच्या वाढत्या समस्येचे संधीत रूपांतर करून एक प्रेरणादायी उदाहरण समोर ठेवले आहे.

दिल्लीतील तरुण उद्योजक मोहम्मद सुहेल याने प्लास्टिक रिसायकलिंगसाठी 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स' या कंपनीची स्थापना केली. त्याने प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्याचा एक अनोखा मार्ग शोधला आणि हा मार्ग किफायतशीर आणि पर्यावरणपूरक बनवून लाखो रुपयांची उलाढालही केली. सुहेल कचऱ्याचे कंपोस्टेबल पॅकेजिंगमध्ये रूपांतर करतो. तो या व्यवसायातून दरवर्षी १.३ कोटी रुपये कमवत आहे.

**वडिलांकडून प्रेरणा**

मोहमद दिल्लीच्या अरुंद रस्त्यांमध्ये लहानाचा मोठा झाला. लहानपणापासूनच तो वडिलांना मजूर म्हणून काम करताना पाहत आला. त्याचे वडील पॅकेजिंग मटेरियलसाठी कचऱ्यातील पॉलिएस्टर आणि कागद वापरत असत. या निरुपयोगी गोष्टींचा सर्वोत्तम वापर कसा करता येईल याचा विचार करताना त्याला हा व्यवसाय सुचला. त्याने दिल्ली विद्यापीठातून पदवी आणि इग्नूमधून सामाजिक कार्यात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. महाविद्यालयीन काळात सुहेल मुलांसाठी शिक्षण निधी उभारणे आणि कौशल्य विकास यासारख्या सामाजिक कार्यात भाग घ्यायचा. या काळात त्याने प्लास्टिक प्रदूषण आणि पारंपारिक पॅकेजिंगमुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी संशोधन सुरू केले.

**ही कल्पना कशी सुचली ?**

३२ वर्षीय सुहेल दिल्लीतील वाढत्या प्रदूषणामुळे तो खूप अस्वस्थ होता. दिल्लीच्या रस्त्यांवरील कचऱ्याच्या ढीगांचा त्याला खूप त्रास होई. यावर विचार करतानाच प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून पॅकेजिंग मटेरियल तयार करता येते, हे त्याच्या लक्षात आले.

**सुहेलसमोरील आव्हाने**

प्लास्टिक कचऱ्याचे पॅकेजिंग मटेरियलमध्ये रूपांतर करण्याची ही उत्तम कल्पना सुचली, पण त्याच्यासमोरील आव्हानेही कमी नव्हती. सुरुवातीला कंपन्यांना प्लास्टिक कचरा फेकून देण्यापेक्षा आपल्याला द्यावा, हे पटवून देणेच एक मोठे आव्हान होते. हळूहळू त्याने पर्यावरणपूरक आणि इतर समस्या सोडवून कंपन्यांचा विश्वास संपादन केला. २०२० मध्ये सुहेलने पाच लाख रुपयांत पायलट प्रोजेक्ट म्हणून 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स'ची स्थापना केली. त्याची टीम प्लास्टिक कचरा गोळा करत असे. त्याचा वापर कोरोगेटेड बॉक्स, पाकिटे, क्राफ्ट पेपर आणि झिपर पाऊच सारखे साहित्य बनवण्यासाठी केला जात असे. व्यवसाय सुरू केल्याच्या पहिल्या वर्षातच त्याने ४० कंपन्यांना ग्राहक बनवून मोठे यश मिळवले. त्यानंतर हळूहळू त्याच्या पॅकेजिंग उत्पादनांची मागणी वाढू लागली.



**सातशे कंपन्या ग्राहक**

सध्या ७०० हून अधिक कंपन्या त्याच्या ग्राहक आहेत. त्याच्या कंपनीची प्रमुख केंद्रे दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, जयपूर, हैदराबाद, लखनऊ आणि नोएडा येथे आहेत. तो भारतात दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे २६,००० टन प्लास्टिक कचऱ्यापासून पर्यावरणपूरक पॅकेजिंग उत्पादने बनवतो. त्यामुळे हा प्लास्टिक कचरा जमिनीत जाण्यापासून रोखला जातो आणि प्लास्टिक उत्पादनाचा पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी होतो.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

## गॅजेटच्या दुनियेत

### निगा इन्व्हर्टरच्या बॅटरीची





इन्व्हर्टर बॅकअप देणे थांबवतो किंवा चार्जिंगमध्ये समस्या येते तेव्हा बहुतेक लोक बॅटरी उघडतात; पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. बॅटरीमध्ये पाणी (डिस्टिल्ड वॉटर) घालण्याची योग्य वेळ असते आणि ती पाळली गेली तर बॅटरी वर्षानुवर्षे व्यवस्थित काम करते. कमी वीजपुरवठा होत असेल आणि इन्व्हर्टर जास्त वापरला जात नसेल, तर दर २-३ महिन्यांनी एकदा बॅटरीची पाण्याची पातळी तपासणे पुरेसे आहे. उन्हाळ्यात इन्व्हर्टर दररोज तासन्तास चालत असेल तर दर १ ते १.५ महिन्यांनी पातळी निश्चितपणे तपासावी. प्रत्येक बॅटरीवर पाण्याच्या किमान आणि कमाल पातळीच्या खुणा असतात. पाणी किमानपेक्षा कमी गेले तर ताबडतोब डिस्टिल्ड वॉटर घाला. लक्षात ठेवा पाणी जास्त किंवा खूप कमी नसावे, ते फक्त दोन खुणांच्या मध्ये अससायला हवे. नेहमी डिस्टिल्ड वॉटर वापरा. नळाच्या पाण्यामुळे बॅटरी खराब होऊ शकते. बॅटरी तपासताना, हातमोजे आणि चष्मा घाला. बॅटरी खूप गरम होत असेल तर विलंब न करता तज्ज्ञांकडून ती तपासून घ्या. गरज नसताना बॅटरीचे कव्हर उघडू नका.

# लिनन आणि कॉटनपैकी काय निवडावे?

फॅशन पॅशन

लिनन हे तरुणाईचे आवडते फॅब्रिक आहे. पूर्वी केवळ राजकारण्यांसाठीच्या मानल्या जाणाऱ्या या कापडप्रकाराने तरुणांच्या फॅशनविश्वातही मानाचे स्थान पटकावले आहे. कॉटनप्रमाणेच लिननही नैसर्गिक रॉ मटेरियलपासून तयार केले जाते. लोकांना कॉटनबद्दल माहिती असते, परंतु लिननबद्दल तेवढी माहिती नसते.



✻ **पोतातील फरकः** लिनन नैसर्गिक फायबरपासून तयार केले जाते. म्हणून त्याचा पोत जाड आणि किंचित खडबडीत असतो. हे फॅब्रिक अंबाडीच्या वनस्पतीपासून तयार केले जाते. तर कॉटन कापसापासून मिळते. त्यामुळे त्याचा पोत खूप गुळगुळीत आणि मऊ असतो. लिननच्या तुलनेत कॉटन खूप मऊ आणि आरामदायी असते.

✻ **कोणते फॅब्रिक जास्त हवादारः** लिनन फॅब्रिक थोडे खडबडीत असते. त्यामुळे ते खूप हवादार असते. खूप घाम येणाऱ्यांसाठी हे फॅब्रिक चांगले असते. कॉटनही हवादार असते, परंतु लिननइतके नसते. दोघांची तुलना केली तर लिनन चांगला पर्याय ठरू शकतो.

✻ **मजबुतीमध्ये फरकः** पोत जाड असल्यामुळे लिनन कॉटनपेक्षा मजबूत असते आणि जास्त काळ टिकते. कॉटन मऊ असल्याने काही प्रमाणात कमी टिकाऊ असू शकते. ते वारंवार धुतले तर ते कमकुवत होते आणि खराब होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अधिक हवादार आणि टिकाऊ कपडे घालायचे असतील तर लिनन निवडा. आरामदायी आणि मऊ पोत असलेले कपडे घालायचे असतील, तर कॉटन निवडा.

## टेक टॉक

### 'डिह्युमिडीफायर'चा किफायतशीर पर्याय



डिह्युमिडीफायर हा एक स्मार्ट पर्याय म्हणून उदयाला येत आहे. तो आर्द्रता तर कमी करतोच, पण हवा फ्रेश बनवतो आणि घर निरोगी बनवतो. डिह्युमिडीफायर उष्णतेपासून दिलासाही देतो. आर्द्रतेमुळे भिंतींमध्ये ओलावा, वास आणि बुरशीसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे श्वासोच्छ्वास आणि ॲलर्जीसारख्या आरोग्य समस्या निर्माण होतात. हे उपकरण या सर्व समस्यांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवू शकते. ओलाव्यामुळे महागडे फर्निचर, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स आणि कपडेदेखील खराब होऊ शकतात. डिह्युमिडीफायर त्यांचे संरक्षण करते. याची किंमतदेखील फार नाही.

# जातीचा अडसर आहे

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची नोकरदार तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम जडलं आहे. तो दुसऱ्या जातीचा असल्याने घरच्यांना हे नातं मान्य नाही. ते आंतरजातीय विवाहाच्या विरोधात आहेत. मी त्याच्याशी लग्न केलं तर आत्महत्या करण्याची धमकी कुटुंबियांनी दिली आहे. या सगळ्या प्रकरणात मला खूप नैराश्य आलं आहे. परिस्थिती हाताबाहेर चालली आहे. आम्हाला लग्न करायचं असलं तरी पालकांची परवानगीही हवी आहे. माझ्या कुटुंबियांना लग्नासाठी कसं तयार करू?



**उत्तर :** तुझ्या कुटुंबियांचा दृष्टिकोन, मतं बदलण्याची प्रक्रिया आव्हानात्मक असणार यात काहीच शंका नाही. मात्र तू निराश होऊ नकोस. या प्रक्रियेत सततच्या संवादाची आवश्यकता आहे. कौटुंबिक आप्त किंवा तुमच्या कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीच्या मताचा तुझे पालक आदर करत असतील तर याबाबत त्यांची मदत घेता येईल. पालकांशी शांतपणे संवाद साध. त्या मुलाशी लग्न करण्यामागची कारणं त्यांना समजावून सांग. त्यांची बाजूही समजून घे. आक्रस्ताळेपणा करू नकोस. तुझ्या प्रियकराशी स्वतंत्रपणे बोलण्याचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेव. पण याचा अट्टाहास धरू नकोस. जातीव्यवस्थेबाबत त्यांची मतं जाणून घे.

# आळस सोडा, हालचाल वाढवा

फिटनेस फंडा

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा.




व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्याला बाहेर फिरायला नेणं, घरची कामं अशा ॲक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरातल्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. वर नमूद केलेले छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲपचे 'ग्रुप व्हॉइस चॅट' ॲप




व्हॉट्सॲपने 'ग्रुप व्हॉइस चॅट' नावाचे एक नवीन टूल लाँच केले आहे. या ॲपमुळे संभाषणे अधिक सोपी आणि रंजक बनतील. व्हॉट्सॲपचे हे नवीन फीचर विशेषतः ग्रुपमध्ये लांब संभाषणे टाइप करणे टाळू इच्छिणाऱ्या लोकांसाठी आहे. आता तुम्ही ग्रुप चॅटमध्ये थेट तुमच्या आवाजात बोलू शकता, तेही हँड्सफ्री आणि रिअल-टाइममध्ये. या फीचरमुळे कॉल न करता थेट ग्रुपमध्ये लाइव्ह व्हॉइस चॅट सुरू करता येते. सुरुवातीला हे फीचर फक्त मोठ्या ग्रुप्समध्ये वापरता येत होते, परंतु आता ते सर्व लहान-मे;ठ्या सर्व ग्रुप्सवापरता येणार आहे. हा ग्रुप अगदी ३-४ लोकांचा असो किंवा १०० पेक्षा जास्त सदस्यांचा, आता सर्व युजर्स या व्हॉइस चॅटचा लाभ घेऊ शकतात. अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्ससाठी हे फीचर खुले झाले आहे. त्याचे अपडेट तुमच्या फोनवर अद्याप आले नसेल तर थोडी वाट पाहा.

# गोडचिनमलकी धबधब्याचे नैसर्गिक सौंदर्य

भटकंती

बेळगाव जिल्ह्यातील गोकाक तालुक्यातील गोडचिनमलकी धबधबा पर्यटकांसाठी ते एक लोकप्रिय ठिकाण ठरत आहे. या धबधब्याला मार्कंडेय धबधबा म्हणूनही ओळखले जाते. विशेषत: जून ते ऑक्टोबर या काळात या ठिकाणाचे निसर्गसौंदर्य अनुभवण्यासारखे असते. बेळगाव शहरापासून ५१ तर गोकाकपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी मार्कंडेय नदी निसर्गसौंदर्याने नटलेल्या दरीमध्ये कोसळते.



पावसाळ्यापूर्वीचे आल्हाददायक हवामान आणि पावसाळ्यात धबधब्याचे निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना आकर्षित करते. गोडचिनमलकी या गावापर्यंत जाण्यासाठी परिवहन मंडळाच्या बससह खासगी प्रवासी सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. वर्षापर्यटनाच्या काळात गोकाक फॉल्स येथून गोडचिनमलकीला प्रवासी वाहने सोडली जातात. यानंतर सुमारे दीड किलोमीटरची पायवाट आहे. त्यामुळे प्रत्येकाला या ठिकाणी ट्रेकिंगचा अनुभव घेता येतो.

**सोईसुविधा**

पर्यटकांची संख्या वाढत असल्याने येथील स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. गावात आणि आजूबाजूला भोजनालये आणि स्टेशनरी दुकानांची संख्याही वाढत आहे. पूर्वी या ठिकाणी स्थानिक पर्यटकांची गर्दी होत होती, पण आता बेळगावमध्ये पर्यटनासाठी येणारे पर्यटक हमखास या ठिकाणाला भेट देतात. एक दिवसाची सहल म्हणूनदेखील एक चांगले पॅकेज इथे तयार केले जाते.

**पर्यटकांसाठी बसची व्यवस्था**

परिवहन मंडळाकडून दरवर्षी पावसाळ्यात पर्यटन विशेष बस सुरू केली जाते. ही बस सकाळी साडेसात वाजता बेळगाव मध्यवर्ती बसस्थानकावरून सुटून गोकाक फॉल्सला पोहोचते. त्या ठिकाणी काही काळ थांबून नंतर ही बस गोडचिनमलकीला रवाना होते. तिथे भेट दिल्यानंतर बस हिडकल डॅमला जाते. अशी तीन पर्यटनस्थळे केल्यानंतर बस प्रवासी घेऊन सायंकाळी सात वाजता बेळगावचा परतीचा प्रवास करते. ही तिन्ही स्थळे एकमेकांजवळ आहेत. वर्षभर या धबधब्याला पाणी राहते.

# साधा व्यक्तिमत्व विकास

स्किल डेव्हलपमेंट

स्वत:ला एक उत्तम विद्यार्थी बनवायचे असेल, तर फक्त वर्गाच्या भिंतींपुरतेच शिक्षण मर्यादित ठेवू नका. आपण शिकत असलेली कौशल्ये बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची असली, तरी विचारांचे जग उघडण्यासाठी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे.



वर्तमानपत्रे, मासिके वाचण्याची सवय लावून घ्या. जेणेकरून देशात आणि जगात घडणाऱ्या घटनांबद्दल माहिती मिळेल. यामुळे सामान्य ज्ञान सुधारेल. याशिवाय, तुम्ही घरातील निर्णयांमध्ये स्वत:चे मत देऊ शकता, जेणेकरून तुमची निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. तसेच, तुमच्या या आचरणामुळे आपण जबाबदारी घेतोय हे घरच्यांच्या लक्षात येईल. त्याच वेळी, घरातील इतरांच्या आवडींबद्दल उत्साह दाखवा. त्यातून तुम्ही घरच्यांचा विचार करता हे दिसून येईल. याशिवाय, इंटरनेटवर नवीन माहिती शिकण्याचे मार्ग शोधा. हे आपल्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक आहे आणि नवीन गोष्टी जाणून घेण्याची सवय तुम्हाला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल. चारचौघांमध्ये गेल्यावर बुजून जाऊ नका. विविध माध्यमांतून शिकलेल्या गोष्टींमुळे येणारा आत्मविश्वास इतरांना जाणवू द्या. पुढील आयुष्यात सभाधीटपणा खूप उपयोगी पडतो. त्याची सुरूवात अशा प्रसंगांमधूनच होत असते, हे लक्षात ठेवा.

# 'चिटी'चा धोका प्रत्यक्षात?

वेगळे काही

रजनीकांतच्या 'रोबो' या चित्रपटात चिटी नावाचा रोबो नायिकेवर प्रेम करू लागतो आणि त्यातून त्याची निर्मिती करणारा नायक आणि चिटीमध्ये वितुष्ट येते, असे दाखवण्यात आले आहे. आता ही काल्पनिक कथा प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आतापर्यंत मानवांच्या आदेशांचे पालन करणाऱ्या 'एआय मॉडेल्स'नी स्वत:चे अस्तित्व वाचवण्यासाठी हे आदेश पाळण्यास नकार देण्यास सुरूवात केली आहे. अलिकडच्या एका संशोधनानुसार काही 'हाय-टेक एआय मॉडेल्स'नी स्वतःला बंद करण्यास स्पष्टपणे नकार दिला. इतकेच नाही तर एका 'एआय मॉडेल'ने सर्व मर्यादा ओलांडताना एका अभियंत्याला धमकीही दिली!

'पॅलिसेड रिसर्च' या अमेरिकन संशोधन संस्थेने 'एआय मॉडेल्स'वर काही विशेष चाचण्या केल्या. त्यात 'एआय सिस्टम्स'ना स्वतःला बंद करण्यास सांगितल्यावर काही मॉडेल्सनी या आदेशाचे पालन करण्यास नकार दिल्याचे आढळून आले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अँथ्रोपिक कंपनीच्या 'क्लॉड ओपस ४' नावाच्या मॉडेलने, आपल्याला काढून दुसरे नवीन मॉडेल आणल्यास संबंधित अभियंत्याचे वैयक्तिक संबंध उघड करेन अशी धमकी दिली. म्हणजेच आता 'एआय' केवळ स्मार्ट झाले नाही, तर त्याने ब्लॅकमेलिंगदेखील सुरू केले आहे.

संशोधनात, 'ओपन एआय'च्या 'चॅटजीपीटी ओ ३' या नव्या मॉडेलचे वर्तन सर्वाधिक चिंताजनक होते. अहवालानुसार, ओ ३ मॉडेलने १०० पैकी ७ वेळा बंद होण्यास नकार दिला आणि त्याला अनपेक्षित आदेश देण्यात आला तेव्हा त्यांनी ७९ वेळा बंद होण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही, तर कोडेक्स मिनी आणि ओ ४-मिनी सारख्या मॉडेल्सनीही अनेक वेळा तांत्रिक हुशारी दाखवून स्वतःला बंद होण्यापासून वाचवले. मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. गुगलच्या जेमिनी २.५ प्रो, एक्सएआयच्या ग्रोक ३ आणि क्लॉड ओपस सारख्या इतर मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. यापैकी काहींनी तुलनेने चांगले वर्तन दाखवले; परंतु काहींनी प्रसंगी ते आदेशाकडे दुर्लक्ष केले.



आता प्रश्न उद्भवतो की 'एआय' मानवी आदेशांचे पालन करण्यासाठी तयार करण्यात आले, तर ते नकार का देत होते? तज्ज्ञांच्या मते यासाठी 'एआय' प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या नवीन पद्धती कारणीभूत असू शकतात. विशेषतः मॉडेल्सना प्रोग्रामिंग आणि गणिताशी संबंधित जटिल समस्या सोडवण्यासाठी 'रीइन्फोर्समेंट' लर्निंग दिले जाते, तेव्हा ते 'टास्क कम्प्लीशन'वर अधिक लक्ष केंद्रित करतात. म्हणजेच कसेही करून काम पूर्णत्वास गेले पाहिजे, असे त्यांना शिकवले जाते. आता यामुळे 'एआय'च्या सुरक्षिततेवर आणि नियंत्रणाबद्दल नवीन वादविवाद सुरू झाला आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी स्वायत्त झाले तर काय होईल, आपल्याला 'एआय'ची भीती बाळगण्याची गरज आहे का, असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. एक गोष्ट निश्चित आहे, की आता 'एआय' केवळ आपल्या प्रश्नांची उत्तरेच देत नाही, तर ते विचार करू लागले आहेत. आता तर ते धमकीदेखील देऊ लागले आहेत. त्याला मानवांसारख्या भावना नाहीत, परंतु स्वत:चा बचाव करण्याची हुशारी त्याने निश्चितच आत्मसात केली आहे.

# समृद्धी महामार्गावर लूटीचे सत्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
समृद्धी महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांवर दगडफेक करून लुटणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याची धक्कादायक माहिती खूद्द नागरिकांकडून समाज माध्यमांवर शेअर केली जात आहे. त्यात बिहार, उत्तर प्रदेशांतर आता महाराष्ट्रातही या घटनेबाबत गंभीर टीका करण्यात आली आहे.

समाज माध्यमावरील एक्सवर प्रतिक पाटील या व्यक्तीने काही व्हिडिओ टाकले. सोबत पोस्ट करतांना त्याने लिहले की, समृद्धी महामार्गावर छत्रपती संभाजीनगरहून नागपूरला जातांना बोगद्याचा आसपास वाहनांवर गडफेक करून लुटालूट करणे सुरू आहे.

या महामार्गावर पोलीसांसह कोणतीही अत्यावश्यक सेवाही उपलब्ध नसल्याचा दावाही प्रतिप पाटील यांनी केला आहे.

दरम्यान या पद्धतीच्या घटना यापूर्वी उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांत एकायला मिळत होत्या. परंतु आता महाराष्ट्रातील समृद्धी महामार्गावर या घटना घडत असल्याने त्याने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहे.

या पोस्टमध्ये प्रतिकने तीन व्हिडिओ पोस्ट करत ते समृद्धी महामार्गावरील


वाहनावर दगडफेक केल्याने समोरची काच फुटल्याचे दिसून येते.

असल्याचा दावा केला आहे. दरम्यान यापूर्वीही समृद्धी महामार्गावर दगडफेक करून लुटमारीच्या घटना घडल्या आहे. त्याबाबतचे गुन्हेही संबंधित पोलीस ठाण्यात नोंदवले गेले आहे. या महामार्गाने प्रवास करणाऱ्यांच्या मनात धडकी भरली आहे.

समृद्धी महामार्गावरील सततच्या अपघातांची मालिका चिंतेचा विषय आहे. आता हे अपघात कमी झाले. परंतु या मार्गावरील प्रवास वाहनावरील दगडफेक व लुटीमुळे धोकादायक ठरत असल्याचा आरोप आता प्रवाश्यांकडून होऊ लागला आहे. दरम्यान छत्रपती संभाजीनगरहून नागपूरला येतांना संभाजीनगरचा बोगदा ओलांडल्यावर नागपूरकडे येतांना १२ किलोमीटरवर या घटना घडत असल्याचा दावा प्रतिक पाटील या व्यक्तीने एक्सवर केला आहे.

अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून
# बच्चू कडू अपात्र

## विभागीय सहनिबंधकांचा निर्णय



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :
प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांना अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदावरून अपात्र ठरवण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक यांनी न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठेवत हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

बच्चू कडू यांना अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून अपात्र करण्यासाठी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांच्यासह ११ जणांनी याचिका दाखल केली होती. नाशिक न्यायालयाने बच्चू कडू यांना एका प्रकरणात एक वर्षाचं शिक्षा ठोठावली होती.

याचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी आपणास अपात्र का करण्यात येऊ नये? तसेच पुढील पाच वर्षांसाठी आपणास सदरचे पद धारण करण्यास अपात्र का करू नये? अशी नोटीस बजावली होती. तसेच २४ फेब्रुवारी रोजी साक्ष नोंदवण्यासाठी प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहावे व म्हणणे सादर करावे, असेही नोटीसमध्ये म्हटले होते.

त्यात आता विभागीय सहनिबंधकांनी अध्यक्षपदावरून अपात्र ठरवण्याचा निर्णय घेत मोठा दणका दिला आहे.

२०१७ साली नाशिकच्या सरकारवाडी पोलिस ठाण्यात बच्चू कडू यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आणि मारहाण केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. नाशिकच्या विशेष न्यायालयाने २०२१ साली बच्चू कडू यांना एक वर्षापर्यंत कठोर कारावासाची शिक्षा सुनावली होती.

बच्चू कडू यांनी या शिक्षेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले असून हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याच प्रकरणाचा आधार घेत व दाखला दाखवत विरोधी गटातील संचालकांनी बच्चू कडू यांना संचालक पदावरून हटवण्याची मागणी केली होती.

तसेच बच्चू कडू यांनी पंधरा दिवसात आपले म्हणणे मांडण्याचे आदेशही त्यावेळी देण्यात आले होते. अशातच एक वर्षाची शिक्षा असल्याचा दाखला देत बच्चू कडू यांच्याविरोधात मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

# ठाकरे गट 'स्थानिक' स्वबळावर लढणार?

## भास्कर जाधव यांनी दिले संकेत



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १७ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महाविकास आघाडीला डावलून स्वबळावर लढवण्याचे संकेत दिलेत.

२-४ जागा घेऊन आम्ही आघाडी करणार नाही. सन्मानजनक जागा मिळणार असतील तर आम्ही आघाडीसोबत राहू. अन्यथा हा प्रश्न आमच्यासाठी जर - तरच आहे, असे ते म्हणालेत. भास्कर जाधव मागील ३ दिवसांपासून विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी सोमवारी चंद्रपूर जिल्ह्यातील ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात त्यांना महाविकास आघाडीत २-४ जागा मिळत असतील तर आघाडी करण्याची काहीही गरज नसल्याचे स्पष्ट केले. कार्यकर्त्यांना लबाड भाजपपासून सावध राहण्याचाही सल्ला दिला.

राज्यात आपला पक्ष मोठा आहे. उद्धव ठाकरे यांनी राज्याचे नेतृत्व केले आहे. आजही महाविकास आघाडीत सर्वाधिक आमदार आपल्या पक्षाचे आहेत. आघाडीतील पक्षांनी स्थानिक नेत्यांना स्थानिक पातळीवरील परिस्थिती पाहून निर्णय घेण्याचे अधिकार दिलेत. पण याचा अर्थ आपल्या सग्यासोयऱ्यांसाठी २-४ जागा घ्यायच्या आणि बाकी सोडून द्यायचे याला आघाडी झाली असे म्हणता येणार नाही. जागा वाटपात आपलाही वाटा तेवढाच महत्वाचा असला पाहिजे.

आपल्याला दोन-चार जागा घेऊन आघाडी करायची नाही. सन्मानजनक जागा मिळणार असतील तरच आपण आघाडीसोबत राहू. कारण, आघाडीसोबत राहून निवडणूक लढायची की स्वबळावर लढायची हा प्रश्न आता राहिला नाही. हा जर-तरचा प्रश्न आहे, असे भास्कर जाधव म्हणाले.

# छगन भुजबळांनी सोडला नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा हट्ट

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १७ :
नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून सत्ताधारी भाजप व शिवसेनेमध्ये वाद सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी या पदावरील आपला हट्ट सोडला आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी कामे मार्गी लागणे महत्वाचे आहे. त्यासाठी पालकमंत्रिपद हवेच असे काहीही नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत मतभेद निर्माण झालेत. सरकारने प्रारंभी या जिल्ह्याचे पालकत्व भाजप नेते गिरीश महाजन यांच्याकडे सोपवले. त्यामुळे शिंदेसेना नाराज झाली. शिवसेनेला हे पद आपले नेते दादा भुसे यांच्यासाठी हवे होते. त्यामुळे सरकारने



महाजन यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली. त्यानंतर छगन भुजबळ यांचा सरकारमध्ये समावेश झाला. हे पद भुजबळांकडे जाईल असे वाटत होते. पण आता भुजबळांनीही या शर्यतीतून अंग काढून घेतल्यामुळे हे पद गिरीश महाजन किंवा दादा भुसे या दोघांपैकी एकाला मिळण्याची शक्यता आहे.

# एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर

## पीसीएम ग्रुपमध्ये २२ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसह पालकांची उत्सुकता अखेर संपली आहे. दोन दिवसांपूर्वी नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आज १६ जून रोजी एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत २२ विद्यार्थ्यांनी १०० टक्के म्हणजेच परिपूर्ण पर्सेंटाइल गुण मिळवले आहेत.

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) गटासाठी हा निकाल जाहीर असून cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर निकाल पाहता येणार आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (पीसीबी) गटाचा निकाल आज 17 जून रोजी जाहीर केला जाईल.

बारावी नंतरच्या शिक्षणासाठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्याच्या दृष्टीने एमएचटी-सीईटी ही राज्य सरकारमार्फत घेतली जाणारी एक महत्त्वाची परीक्षा आहे. विज्ञान शाखेतून अभियांत्रिकी, फार्मसी आणि कृषी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा प्रवेशद्वाराचे काम करते. यशस्वी विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रवेश प्रक्रियेला गती मिळणार आहे.

असा पाहा सीईटीचा निकाल

वेबसाइट cetcell.mahacet.org ला भेट द्या . होम पेजवर, PCM ग्रुपसाठी निकाल लिंकवर क्लिक करा. तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी, पासवर्ड टाकून लॉगिन करा. तुमचा निकाल तपासा आणि डाउनलोड करा.

पीसीबी गटासाठी ९ ते १७ एप्रिल आणि पीसीएम गटासाठी १९ एप्रिल ते ५ मे या कालावधीत एमएचटी सीईटी परीक्षा घेण्यात आली होती.

# नागपूर - मिरज चार विशेष रेल्वेगाड्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या वारी मेळ्यादरम्यान मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर आणि मिरज दरम्यान चार विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूर ते मिरज विशेष गाडी ४ आणि ५ जुलै रोजी सकाळी ८.५० वाजता नागपूर स्थानकावरून प्रस्थान करेल व दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५५ वाजता मिरज स्थानकावर पोहोचेल.

मिरज ते नागपूर विशेष गाडी ६ आणि ७ जुलै रोजी दुपारी १२.२५ वाजता मिरज स्थानकावरून प्रस्थान करेल व दुसऱ्या दिवशी १२.५५ वाजता नागपूर स्थानकावर येईल. या गाडीला अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा,मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डूवाडी, पंढरपूर, सांगोला,म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठे महांकाळ, सलगर, अरग येथे थांबे देण्यात आले आहते. या गाडीला एकूण १८ डबे राहतील. यामध्ये १० शयनयान डबे, ४ सर्वसामान्य श्रेणी डबे, दोन वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे राहतील.

लहानपणी पोलिओ, पायावर दोनदा शस्त्रक्रिया...
# तरीही बीजिंगमध्ये गोल्ड मेडलचा निश्चय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
मंगळवार, १७ जूनपासून बीजिंग इथे सुरू होणाऱ्या पॅरा वर्ल्डकपमध्ये नागपूरची युवा वेटलिफ्टर प्रतिमा बोंडे सहभागी होणार आहे.

वेटलिफ्टिंग खेळात निवड झालेली प्रतिमा बोंडे महाराष्ट्राची एकमेव खेळाडू आहे. एका पायानं दिव्यांग असलेल्या प्रतिमाने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या आणि जिंकल्या आहेत. बीजिंगला जाण्यापूर्वी वेटलिफ्टर प्रतिमा बोंडेने देशासाठी गोल्ड मेडल जिंकण्याचे स्वप्न उराशी बाळगले असून दिवसातील सहा ते आठ तास जिममध्ये सराव केला.

प्रतिमाचा जन्म सर्वसामान्य कुटुंबात झाला. आई-वडील आणि पाच भावंडांत सर्वात लहान असलेली प्रतिमा जन्माच्या वेळी सुदृढ होती. नऊ महिन्यांची असताना शरीराचा एक भाग प्यारालाइज झाला. त्यामुळे तिच्या एका पायाला पोलिओ झाला.

त्यानंतर तिच्या पायावर दोन वेळा शस्त्रक्रिया झाल्या, मात्र त्याचा फार उपयोग झाला नाही. जीवनात संघर्षाला सकारात्मकतेने सामोरे जात असल्याने तिने तिच्या दिव्यांगत्वाचा कधी बाऊ केला नाही. जिद्द आणि मेहनतीच्या बळावर तिने पॅरा वेटलिफ्टिंग खेळाडूंमध्ये जागतिक स्तरावर स्थान निर्माण केले असून यात यशासाठी प्रयत्न करत आहे.


प्रतिमा बोंडे हिच्या आईची इच्छा होती की तिनं वेटलिफ्टिंग क्षेत्रात काहीतरी करून दाखवावे त्यासाठी लागेल तेवढी मेहनत घेण्याची तयारी प्रतिमाच्या आईची होती. मात्र, दोन वर्षांपूर्वी तिच्या आईचे निधन झाल्याने काही दिवस ती नैराश्यामध्ये गेली होती. मात्र, लवकरच त्यातून बाहेर येत खेळावर लक्ष केंद्रित केले. परिस्थितीवर मात करत तिने बीजिंग वर्ल्ड कपवर फोकस केला आहे. त्यामुळे तिने आता याबाबत तयारीही केली आहे.



वेटलिफ्टर प्रतिमा बोंडे हिला आंतरराष्ट्रीय पॅरा वेटलिफ्टर म्हणून ओळख मिळायला लागली आहे. ती सध्या जागतिक क्रमवारीत ११ व्या स्थानी आहे, तर आशिया क्रमवारीत ८ व्या स्थानी आहे. अर्जुन पुरस्कार विजेते विजय मुनीश्वर यांच्या मार्गदर्शनात तिने हे यश संपादन केले आहे. पॅरा वर्ल्ड कपसाठी प्रतिमानं संपूर्ण तयारी केली असून यावेळी मेडल जिंकायचा निश्चय केला आहे. यापूर्वी तिने दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला होता. मात्र, यशाने हुलकावणी दिल्याचे तिने या वेळी सांगितले.

अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त विजय मुनीश्वर यांच्या मार्गदर्शनात प्रतिमा बोंडेने वेटलिफ्टिंगचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असून मुनीश्वर यांना प्रतिमाकडून गोल्ड मेडलची अपेक्षा आहे. प्रतिमाच्या खेळात सातत्य आहे. इतर खेळाडूंपेक्षा उजवी खेळाडू असल्याचे मुनीश्वर म्हणाले.

लोकारोग्य



## मुलांमधील किडनी संसर्ग लक्षणे, कारणे आणि परिणाम

: हॅलो डॉक्टर :
पालक म्हणून आपण आपल्या मुलांच्या आरोग्याची अधिक काळजी घेण्याला प्राधान्य देतो. पण, आरोग्याला धोका असलेला आजार निदर्शनास आला नाही तर आणि खूप उशीर होईपर्यंत त्याकडे दुर्लक्ष केले तर मुलांमध्ये किडनी संसर्ग हे तुम्ही करू शकणाऱ्या विचारापेक्षा अधिक सामान्य आहेत आणि उपचार न केल्यास ते गंभीर गुंतागूंत निर्माण करू शकतात, जसे किडनीचे नुकसान किंवा किडनी निकामी होणे.

किरकोळ संसर्गामुळे जीवघेणा आजार होऊ शकतो. मुलांचे आरोग्य जपण्यासाठी धोक्याची लक्षणे जाणून घेणे, हे का घडते हे समजून घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच निमित्ताने डॉ. निशा कृष्णमूर्ती, कन्सल्टन्ट पेडिएट्रिक नेफ्रोलॉजी, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल यांच्याशी केलेली बातचीत.

**मुलांमधील किडनी संसर्गाची धोक्याची लक्षणे कोणती?**

■ किडनी संसर्गांची लक्षणे दिसून येत नाहीत, ज्यामुळे त्यांचे निदान करणे आव्हानात्मक ठरते. उच्च ताप (बहुतेकदा १०२ अंश फॅरेनहाइट किंवा ३९ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त), थंडी वाजून येणे आणि थरथरणे,पाठीच्या खालच्या भागात, बाजूला किंवा पोटात वेदना, वारंवार लघवी होणे किंवा लघवी करण्यास त्रास होणे फिकट, दुर्गंधीयुक्त किंवा रक्ताळलेली लघवी, उलट्या आणि मळमळ, थकवा आणि चिडचिड, कमी भूक किंवा वजन कमी होणे

या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने किडनीचे कायमचे नुकसान होऊ शकते, म्हणून लवकर निदान आणि वैद्यकीय हस्तक्षेप आवश्यक आहे.

**या किडनी संसर्गाची सामान्य कारणे काय आहेत?**

■ मूत्राशयातून मूत्रपिंडात जीवाणू जातात तेव्हा किडनी संसर्ग होतात. विविध घटक धोका वाढवू शकतात. यूरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन्स (यूटीआय) यामुळे यूटीआयमुळे किडनी संसर्गांचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात, (पायलोनेफ्रायटिस किंवा गळू तयार होणे). अनियमितपणे लघवी बाहेर पडणे आणि कमी पाणी पिणे. हि देखील कारण आहेत.

त्याशिवाय लघवी थांबत-थांबत होणे,लघवी थांबत-थांबत झाल्याने मूत्राशयात बॅक्टेरिया वाढू शकतात. संरचनेत असामान्यता काही मुले मूत्रमागातील दोषांसह जन्माला येतात, ज्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते.

बद्धकोष्ठता - भरलेले मल मूत्राशयावर दाब निर्माण करू शकते, ज्यामुळे मूत्रप्रवाहामध्ये अडथळा येतो आणि संसर्गाचा धोका वाढतो.

**मुलांमधील किडनी संसर्गांचे परिणाम काय होऊ शकतात?**

■ उपचार न केल्यास यूटीआयमुळे किडनी संसर्गांचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात, (पायलोनेफ्रायटिस किंवा गळू तयार होणे). वारंवार संसर्ग झाल्यास व्रण येऊ शकतात आणि किडनीचे कार्य कमी होऊ शकते.

किडनीच्या समस्यांमुळे दीर्घकालीन उच्च रक्तदाब होऊ शकतो, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका वाढतो.

**किडनी संसर्ग होऊ नये म्हणून उपचार काय आहेत?**

■ डॉक्टर लघवी चाचण्या, रक्तचाचण्या आणि कधी-कधी अल्ट्रासाऊंड किंवा स्कॅनद्वारे किडनीच्या संसर्गाचे निदान करतात.

उपचारांमध्ये सामान्यतः पुढील प्रक्रियांचा समावेश असतोः संसर्ग काढून टाकण्यासाठी प्राथमिक उपचारबॅक्टेरिया बाहेर काढण्यासाठी योग्यरित्या लघवी होण्यास मदत करते. गंभीर केसेसमध्ये IV अँटीबायोटिक्स आणि देखरेखीची आवश्यकता असू शकते. किडनी संसर्ग गंभीर असू शकतात, पण पालक त्यांचा धोका कमी करू शकतात.

मुलांना भरपूर प्रमाणात पाणी पिण्यास सांगा. पुढून मागे असे स्वच्छ पुसून काढण्यासह योग्य स्वच्छतेबाबत शिकवा. ते अधिक वेळेपर्यंत लघवी करणे थांबवून ठेवणार नाहीत याची खात्री घ्या. ायबरयुक्त आहारासह बद्धकोष्ठतेच्या समस्यांवर उपाय करा. ■ ■




## जागतिक कर्करोग नियंत्रणासाठी WHO सहयोग केंद्राचा नवीन अध्याय

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट सेंटर फॉर ग्लोबल हेल्थ (यूएस एनसीआय-सीजीएच) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) यांनी जागतिक कर्करोग नियंत्रण मजबूत करण्यासाठी त्यांच्या सहकार्याचे नूतनीकरण केले आहे. ८ वर्षांच्या यशस्वी सहकार्यावर आधारित आणि उदयोन्मुख प्राधान्यांना संबोधित करण्यासाठी त्यांच्या संयुक्त कार्याचा विस्तार केला आहे.

नवीन भागीदारी करारात, यूएस एनसीआय, डब्ल्यूएचओ सहयोग केंद्र (डब्ल्यूएचओसीसी) म्हणून त्याच्या भूमिकेत , कर्करोग नियंत्रण योजनांच्या विकास, अंमलबजावणी आणि खर्चात डब्ल्यूएचओला पाठिंबा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण भागीदारीच्या सह-संयोजक म्हणून यूएस एनसीआयवर आधारित आहे. कर्करोग देखरेख, आरोग्य डेटाचा वापर आणि धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे त्यांचे स्थापित लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रगती करण्यास सक्षम क्रियाकलाप सुरू ठेवेल, विशेषतः धोरण अंमलबजावणी संशोधनाद्वारे प्रशासन आणि जबाबदारीच्या पैलूंवर लक्ष केंद्रित करेल. हे सहयोगी कार्य करण्यासाठी यूएस एनसीआय डब्ल्यूएचओसीसी गर्भाशयाच्या ग्रीवे, स्तन आणि बालपणातील कर्करोगांमध्ये ग्लोबल कॅन्सर इनिशिएटिव्हजना देखील समर्थन देईल . कर्करोग महामारीशास्त्रज्ञांचे नेटवर्क तयार करण्यावर लक्ष केंद्रित करेल.

■ ■ ■

## औषधी सुंठ



सुक्या आल्याच्या पावडरला सुंठ असे म्हणतात. ताजे आले सुकल्यानंतर त्यातून काढलेली ती तीव्र वासाची पावडर आहे. आपण ते स्वयंपाक करण्यासाठी आणि बऱ्याच वर्षांपासून औषध म्हणून वापरू शकता. कोरडे आले हे अँटिऑक्सिडंट्स आणि बीटा-कॅरोटीन, कॅप्सेसिन आणि कर्क्यूमिन यांसारख्या दाहक-विरोधी रसायनांनी समृद्ध असतात.कोरडे आले तुमच्या चेहऱ्याला हायड्रेट करण्यासाठी आणि तरुण ठेवण्यासाठी फायदेशीर आहे. हे टोनर म्हणून वापरले जाऊ शकते.

सामान्य डोकेदुखीमध्ये, कोरड्या आल्याच्या पावडरची पेस्ट कपाळावर लावल्याने या वेदना कमी होण्यास मदत होते. मान आणि खांदे दुखत असल्यास ही पेस्ट मानेवरही लावता येते. सर्दी आणि फ्लूच्या बाबतीत छातीत जड होणे आणि घसा खवखवणे सामान्य आहे. सर्दीपासून सुटका मिळवण्यासाठी कोरडे आले वापरता येते. कोरडे आले किंवा आल्याच्या पावडरपासून बनवलेला चहा दिवसातून अनेक वेळा सर्दीवर उपचार करण्यासाठी वापरा. सुक्या आल्यामध्ये थर्मोजेनिक घटक असतात जे चरबी जाळण्यात आणि लठ्ठपणा कमी करण्यास मदत करतात. ■ ■••

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# राज्यातील धोकादायक पुलांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करा

## उपसभापती नीलम गोऱ्हेंची मागणी



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :
पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे झालेल्या दुर्दैवी पुल दुर्घटनेत अनेक निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले व काहीजण गंभीर जखमी झाले. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना पत्र लिहून या घटनेबाबत चिंता व्यक्त केली आहे. संबंधित पुलाच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर झालेला असतानाही काम न झाल्याने ही दुर्घटना घडली असून यासंदर्भात चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी केवळ कुंडमळा पुलच नव्हे तर राज्यातील इतर धोकादायक पुलांचीही माहिती देत त्यांच्यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित केली आहे. खडकवासला धरण पायथ्याजवळील कोंढवे धावडे ते उत्तमनगर या रस्त्यावरचा पुल देखील धोकादायक स्थितीत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे.

त्याचबरोबर, जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवरील बांभोरी पुल, नाशिक जिल्ह्यातील बागलान तालुक्यातील ताहराबाद येथील पुल, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ मार्गावरील कयाधू नदीवरील पुल, वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यातील तांबा गावाजवळील पुल ही देखील धोकादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी या सर्व पुलांची तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यकतेनुसार नवीन पुलांचे बांधकाम अथवा दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याची शिफारस केली आहे. याबरोबरच त्यांनी विभागीय आयुक्त पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर तसेच संबंधित जिल्हाधिकारी पुणे, वर्धा, हिंगोली, नाशिक व जळगाव यांना या बाबत तत्काळ कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्याची शिफारस देखील केली आहे. राज्यातील नागरिकांचा जीव धोक्यात न येण्यासाठी व भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी धोरणात्मक व प्रभावी निर्णय घेणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# लाडकी बहीण योजनेवर चित्रपट

## गौतमी पाटील आणि अण्णा नाईकांची दिसणार केमिस्ट्री

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेवर आता मराठी चित्रपट येणार आहे.

या चित्रपटात प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील आणि रात्रीस खेळ चाले फेम अण्णा नाईक म्हणजेच अभिनेते माधव अभ्यंकर यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. नुकताच या चित्रपटाचा सातारा येथे मुहूर्त पार पडला. मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते सिनेमाच्या मुहूर्ताचा क्लॅप देण्यात आला.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. आतापर्यंत या योजनेचा लाभ असंख्य महिलांनी घेतला आहे. गरीब व कष्टकरी कुटुंबातील महिलांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या दिशेने ही योजना मोलाची ठरली आहे. सर्वाधिक चर्चेत असलेली ही योजना आता मोठ्या पडद्यावर अवतरणार आहे.



'लाडकी बहीण' हा चित्रपट वास्तव आणि मनोरंजन यांची सांगड घालत प्रेक्षकांसमोर मांडला जाणार आहे.

या चित्रपटाची कथा राज्य शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजना या उपक्रमावर आधारलेली असणार आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अनेक महिलांना आर्थिक बळकटी देण्यात आली असून, त्यांची स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली आहे. हा चित्रपट संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाने परिपूर्ण असा अनुभव देईल, असे निर्मात्यांनी सांगितले.


**WANTED**

**Chimur Samajonnti Bahuddeshiya Sanstha, Chimur**
**ARTS AND COMMERCE COLLEGE, BHISI**
**Tah. : Chimur, Dist. : Chandrapur.- 442903**

Website: www.accbhisi.co.in    Email: accbhisi@hotmail.com

*(Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to Gondwana University, Gadchiroli )*

Applications are invited for the following post of Contributory Lecturer on **Clock Hour Basis** for the Session 2025-2026. Qualified candidates should appear for interview along with required documents and application on 27 June 2025 at 11:00 A.M.

| SR. NO. | SUBJECT | NO. OF POSTS | NATURE OF POST | QUALIFICATION |
|---|---|---|---|---|
| 1 | SOCIOLOGY | 01 | Non Granted | As per UGC, Maharashtra Govt. and Gondwana University, Gadchiroli rules and regulations. |

**Shri S. V. Bomewar**
President
College Development Committee

**Dr. V. N. Thawari**
Officiating Principal
Arts and Commerce College, Bhisi